# भाग – I

# घटकसंच

घटकसंच 1 – शालेय नेतृत्व : संकल्पना व उपयोजन

घटकसंच 2 – शाळापूर्व शिक्षण

घटकसंच 3 – शाळेतील पूर्व–व्यावसायिक शिक्षण

घटकसंच 4 – अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील लैंगिक दृष्टिकोनाची उपयुक्तता

घटकसंच 5 – शालेय शिक्षणातील पुढाकार

*तुम्हांला किती अनुयायी आहेत.*
*यापेक्षा तुम्ही किती नेतृत्व विकसित केले,*
*हे चांगल्या नेत्याचे लक्षण आहे.*

*– महात्मा गांधी*

घटकसंच
1

# शालेय नेतृत्व : संकल्पना व उपयोजन

UN68MD01

## प्रस्तावना :

शाळा आणि शिक्षण प्रणालीच्या संकल्पने संदर्भात सर्वसमावेशक माहिती करून देण्यात हा घटकसंच मदत करेल. हा प्रशिक्षण घटकसंच प्रामुख्याने प्राथमिक शाळा मुख्याध्यापक यांच्यासाठी तयार केलेला आहे, ज्याचा मुख्य उद्देश शाळेत बदल व परिवर्तन घडविण्यास योग्य असे शाळा प्रमुख आणि प्रभावी अंमलबजावणी करणारे घटक विकसित करणे हा आहे, ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा दर्जा सुधारेल. तथापि असे निदर्शनास आले आहे की, शाळा स्वतंत्रपणे कार्यान्वयन करीत नाहीत. भारतीय शैक्षणिक व्यवस्थापन संरचनेत शाळा ही केंद्रांतर्गत घटक असून, केंद्र हे गटांतर्गत घटक आणि गट हे जिल्हा अंतर्गत आहेत. (थोड्या फार फरकाने). राष्ट्रीय शालेय नेतृत्व केंद्राचा असा विश्वास आहे की, पूरक आणि सहकार्यशील नेतृत्व तेव्हाच अनुभवता येईल जेव्हा केंद्र, गट आणि जिल्हा स्तरावरील यंत्रणा एकत्रितपणे कार्य करेल. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुधारणा व शालेय अध्ययन संस्कृती निर्माण करण्यासाठीचे शैक्षणिक नेतृत्व, नेतृत्वाच्या भूमिका व जबाबदाऱ्या आणि कार्यतत्पर नेतृत्व याची संकल्पना या संदर्भात हे घटकसंच सविस्तर विवेचन करते. कार्यरत शाळा प्रमुख आणि शाळेत आणि व्यवस्थेतील मुलांच्या अध्ययनात सुधारणा घडून आणण्यासाठी शाळाप्रमुख आणि शालेय व्यवस्थेतील यंत्रणा यांच्या प्रयत्नांशी संबंधित बाबी घटकसंचामध्ये नमूद आहेत. अखेरीस परिवर्तित शाळेची कल्पना व कल्पनेला प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने कार्य करण्याची योजना या संदर्भात या घटकसंचामध्ये एक छोटीशी टीप दिलेली आहे. जरी हे घटकसंच शाळाप्रमुख यासाठी तयार केलेले असले, तरी शालेय व्यवस्थेतील पर्यवेक्षकीय यंत्रणेत कार्य करणाऱ्यांच्या नेतृत्वाविषयीच्या गरजासंबंधी भाष्य करते. घटकसंचामधील प्रत्येक विभागात शालेय व्यवस्थेतील यंत्रणेत कार्य करणाऱ्यांच्या संबंधी बाबी संकल्पना व उपयोजनासह नमूद केलेल्या आहेत.

## घटकसंचाची उद्दिष्टे

**शाळा प्रमुख :**

- शालेय नेतृत्वाच्या विविध भूमिका आणि जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित करून शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन समजण्यास आणि विकसित करण्यात सक्षम बनतील.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुधारणा आणि शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शैक्षणिक नेतृत्व विकसित होईल.
- शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शिकण्यात पूरक सहकार्यशील अध्ययन संस्कृती निर्माण करण्यासाठी शाळा प्रमुख ज्ञान कौशल्य आणि दृष्टिकोन विकसित करतील.

केंद्र, गट आणि जिल्ह्यातील शाळांची शैक्षणिक गुणवत्ता विकसनासाठी शिक्षण व्यवस्थेतील यंत्रणेमध्ये (CRC/BRC/BEO/ABEO/DEO/DPO) सर्वसमावेशक दृष्टी विकसित होईल.

## नेतृत्व विकासासाठी अध्ययन निष्पत्ती :

**ज्ञान, कौशल्य व अभिवृत्ती आराखडा**

ज्ञान, कौशल्य आणि अभिवृत्तीच्या आधारे खाली दिलेल्या चौकटीमधून शाळाप्रमुख आणि शिक्षण व्यवस्थेतील घटक यांच्यासाठी अध्ययन निष्पत्ती समजून घेतील. त्यांच्या शाळेतील, केंद्रातील, गटातील आणि जिल्ह्यातील शैक्षणिक बदल घडविण्यासाठी पुढाकार

घेण्यास शाळाप्रमुख आणि शिक्षण व्यवस्थेतील घटक खालील ज्ञानघटक, योग्य दृष्टिकोन, विकसन आणि कौशल्याच्या आधारे समर्थ होतील असा विश्वास या घटकसंचामधून वाटतो.

- काय? हे ज्ञान दर्शविते – तात्त्विक व प्रात्यक्षिक भाग समजण्याचा घटक.
- कसे? कौशल्य दर्शविते – तात्विक व प्रात्यक्षिक भागाचे कार्यान्वयन करणारे घटक.
- दृष्टिकोन हा प्रत्येकाचा वैचारिक आणि विश्वास प्रणाली दर्शवणारा मुख्य घटक. हा दृष्टिकोन विकसित करते.

| ज्ञान | कौशल्य | अभिवृत्ती |
|---|---|---|
| शालेय नेतृत्व | दृष्टी विकसन | पुढाकार घेणे. |
| अध्यापनशास्त्रीय आशयज्ञान | सहभागीता | सकारात्मक दृष्टिकोन. |
| शैक्षणिक पर्यवेक्षण | संप्रेषण | स्वतःहून पुढाकार घेण्याची वृत्ती. |
| सांघिक अध्ययन | शैक्षणिक पर्यवेक्षण | प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास. |
| शाळा विकास आराखडा | अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील बदलास सहकार्य | अध्ययन वक्रानुसार प्रत्येक मूल प्रगती करते हा विश्वास. |
| शिक्षणात ICT चा वापर | नियोजन आणि आढावा | |

## नेतृत्व : संकल्पना

हा भाग नेतृत्वाच्या संकल्पनेविषयी सखोल स्पष्टीकरण करतो, ज्यात 'स्व' चे महत्त्व आणि प्रभावशाली नेतृत्वाकरिता दृष्टिकोन या प्रमाणेच 'प्रेरणा' महत्त्वाची आहे या मुद्द्याने या भागाच्या विश्लेषणाची सुरुवात होते. शाळाप्रमुख आणि व्यवस्थेमध्ये कार्यरत पर्यवेक्षीय यंत्रणा कोणत्याही परिस्थितीत आढळणाऱ्या नेतृत्वाच्या मूलभूत वैशिष्ट्यांवर विचार करण्यासाठी उद्युक्त करते. एखाद्या शाळेच्या संदर्भात किंवा शैक्षणिक परिस्थितीत नेत्याची भूमिका प्रशासक आणि व्यवस्थापकाच्या भूमिकेच्यापुढे जाऊन समजून घेण्याची गरज आहे. कृतिशील नेतृत्व यासंदर्भात या भागामध्ये संकल्पना अधिक चांगल्या पद्धतीने स्पष्ट केलेली आहे.

## 'स्व' आणि प्रेरणा

'स्व' समजणे हे स्वतःचा दृष्टिकोन आणि क्षमता समजून घेण्यास मदत करते. प्रभावशाली नेतृत्व विकसित होण्यासाठी व्यक्तीचा 'स्व' समजणे त्याला आत्मविश्वास वाढण्यासाठी आणि त्याच्या दृष्टिकोनाबाबत विचार, प्रश्न विचारणे आणि पुन्हा त्यावर विचार करणे या प्रक्रियेसाठी सक्षम बनवितो आणि इच्छित बदलासाठी कृतिशील बनवितो. ही प्रक्रिया तुमच्या दृष्टिकोनाला बदलून 'हो मी करू शकतो' यासाठी मदत करते, विशेषतः जेव्हा आपण समस्यांना सामोरे जातो. ही प्रक्रिया तुमच्या शाळेला रूपांतरित करण्यासाठी तुम्हाला एक नेता म्हणून पुढे येण्यास मदत करते. जेव्हा एखाद्याने 'स्व' मध्ये बदल घडवून आणला तर तो इतरांवर प्रभाव निर्माण करू शकतो तसेच रोल मॉडेल म्हणून आणि समस्या सोडविणारा म्हणून सामोरा येतो. शाळेचे नेतृत्व करणारा म्हणून शाळा प्रमुखाने आपला प्रवास सुरू करताना वरील गुणविशेष अंगी बाळगणे आवश्यक आहे, तथापि 'स्व' चा विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे जी बहुधा आयुष्यभर चालते. या प्रक्रियेमध्ये बऱ्याच बाबींचा समावेश आहे. जिथे आपण आपल्या वागण्याशी, आपल्या विचारांशी किंवा ज्ञान किंवा, कौशल्यांच्या बाबतीत बदल घडवू इच्छित आहोत. इतरांशी संबंध ठेवताना आपली वागणूक सुधारणे, अधिक सकारात्मक दृष्टिकोन तयार करणे, वेगवेगळ्या जीवनातील अनुभवांशी संबंधित आणि 'स्वयं वाचन, इतर सहकाऱ्यांकडून शिकणे किंवा सेवांतर्गत प्रशिक्षणात सहभागी होऊन स्वतःचा व्यावसायिक विकास करणे. आपण स्वतःला विकसित करण्यासाठी अनेक मार्गांपैकी हे काही विविध मार्ग आहेत. आपल्या शाळेचे नेतृत्व करण्यासाठी अधिक आत्मविश्वास वाढवता येईल, तथापि या प्रवासाच्या सुरुवातीस आपण स्वतःला हे विचारणे आवश्यक आहे.

**प्रभावी नेता होण्यासाठी मला कोणत्या मूलभूत गुणविशेषांची आवश्यकता आहे?**

**नेतृत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये**

- जो पहिले पाऊल टाकतो किंवा पुढाकार घेतो.
- सकारात्मक दृष्टिकोन बाळगतो.
- स्वयंप्रेरित
- इतरांना प्रेरित व प्रभावित करणे.
- बदल घडवून आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न टिकवणे.

'नेतृत्वाची भूमिका साकारतांना एखाद्याने पहिले पाऊल उचलणे गरजेचे आहे का?' याबाबत आपण सहमत आहात का? नेतृत्वाच्या मूलभूत गुणविशेषांवर विचार करा. जे आपण वरील यादीत जोडू शकाल. प्रभावशाली नेतृत्व करणाऱ्यास हे गुणविशेष दर्शविणे गरजेचे आहे. घटकसंचाच्या शेवटी आपणास पुरविलेल्या व्हिडिओ लिंक आपण अभ्यासू शकता. या व्हिडिओमधून आपण नेतृत्वाचे कोणते महत्त्वपूर्ण धडे शिकलात?

Lead India Video मधील Video Link बघा.

## कृतिशील नेतृत्व :

दोन प्रकारचे नेतृत्व असू शकते. पदामुळे मिळालेले नेतृत्व किंवा नेमणुकीने मिळालेले नेतृत्व किंवा ज्येष्ठतेमुळे मिळालेले नेतृत्व आणि त्यांच्या कृतीमुळे निवडले गेलेले नेतृत्व. मोठ्या प्रमाणात लोकांना प्रभावित करण्याची त्यांची क्षमता असल्याने तसेच त्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सकारात्मक आणि कृतिशील वृत्ती द्वारे जे कायम इतरांच्या मनामध्ये स्थान मिळवितात आणि एखाद्याच्या मागे लागून त्याचा सातत्याने पाठपुरावा करतात असे नेतृत्व. ते कदाचित कोणत्याही पदावरचे लोक नसतील तरीही ते फक्त त्यांचे विचार आणि कृती द्वारा इतरांना प्रेरणा देतात आणि प्रभावित करून त्यांचे अनुसरण करण्यास बाध्य करतात. शाळा प्रमुख किंवा शालेय व्यवस्थेत कार्यकारी म्हणून आपण एक नेतृत्व करणारे असू शकतात किंवा सेवा ज्येष्ठतेनुसार आपणास हे पद मिळालेले असू शकते, परंतु तुम्ही तुमच्या कार्य कर्तृत्वामुळे नेतृत्व करत आहात काय?

शाळेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी आणि प्रभाव निर्माण करण्यासाठी तुम्ही कृतियुक्त नेते असणे गरजेचे आहे. कृतियुक्त नेतृत्वाचे काही गुणविशेष आहेत जसे – स्वयं प्रेरित, इतरांना प्रभावित करणारे, आंतरव्यक्ती संबंध जोपासणारे, सर्जनशील, चिकित्सक विचार करणारे, निर्णयक्षम आणि संघ बांधणी करण्याची क्षमता असणारे.

## परिभाषित नेतृत्व :

लेमनने परिभाषित केल्याप्रमाणे,' Leadership is understood to be an authority or someone with enough power or influence to head a group of people or organisation'.

चला आपण authority , power आणि influence या शब्दांना समजून घेण्याचा प्रयत्न करू आणि हे प्रत्यक्षात नेतृत्व परिभाषित करण्यास किंवा पुनर्परीभाषित करण्यास कशी मदत करू शकते ते पाहू.

Power (सामर्थ्य) बक्षिसे आणि शिक्षेचा वापर करून एखाद्याच्या वर्तनात बदल घडविण्याची क्षमता म्हणजे सामर्थ्य होय.

सामर्थ्याचे तीन प्रकार आहेत–

1. सक्तीचे सामर्थ्य (वैयक्तिक हानी)
2. परिश्रमिक सामर्थ्य (पैसा)
3. निकषांधारित सामर्थ्य (निकष, अटी, शर्ती, नियम)

Authority (प्राधिकृत अधिकार) कायदेशीर मार्गाने देण्यात आलेला अधिकार. सरकारी अधिकाऱ्याकडे कायदेशीर मार्गाने मान्यता दिलेले प्राधिकृत अधिकार. आपल्याकडे सुद्धा पदाद्वारे प्राधिकृत अधिकार प्राप्त झालेले असतात.

प्रभाव म्हणजे – बक्षीस, शिक्षा तसेच मान्यताप्राप्त अधिकाराशिवाय इतर व्यक्तींच्या वागणूकीत बदल करण्याची क्षमता.

भयमुक्त राहून इतरांवर प्रभाव पाडणे आणि विश्वासार्ह वातावरण निर्माण करणे ही सर्वात उत्तम नेतृत्व शैली आहे. प्रभावाचा परिणाम हा अधिक खोल, दीर्घ व चिरस्थायी असतो. वरील सर्व कारणांमुळे नेतृत्वाकडे आकर्षित होऊ शकणारा एक घटक म्हणजे नेतृत्व ही एक परिणामकारक प्रक्रिया आहे.

## प्रशासनाकडून नेतृत्वाकडे वाटचाल :

शाळेत असताना तुम्ही वेगवेगळ्या भूमिका बजावता. वेगवेगळ्या भूमिका बजावत असतांना कधी कधी प्रशासकाप्रमाणे तुम्हीही संस्थेच्या जबाबदाऱ्या बघता. कधी कधी एखाद्या कंपनीच्या प्रमुखाप्रमाणे तुम्ही शाळेत वेगवेगळे विभाग सांभाळत असता आणि त्या सर्व भूमिका शाळेशी जोडलेल्या असतात. परंतु या सर्व उपक्रमांच्या गडबडीत आपण काय गमावू शकतो ते म्हणजे नेतृत्वाप्रमाणे विचार करणे आणि वागणे होय. आपण केलेले प्रत्येक काम आपल्या शाळेला सुधारणेच्या बाबतीत कुठे घेऊन जाते हे आपण कल्पना करू. प्रशासक, व्यवस्थापक किंवा नेता म्हणून काम करण्याच्या पद्धतीमध्ये एक मुलभूत फरक आहे. खाली दिलेल्या आकृतीचे निरीक्षण करा आणि शाळा प्रमुख म्हणून किंवा व्यवस्थेतील पर्यवेक्षकीय घटक म्हणून आपण नेमके कुठे आहोत याचा निर्णय घ्या.

**प्रशासक**
अटी, शर्तींचे पालन करणारा

**व्यवस्थापक**
कार्य आणि संबंध
यांची जपणूक करणारा

**नेता किंवा नेतृत्व**
दृष्टी स्पॉट
लाईट प्रमाणे

तुम्ही आकृतीत बघू शकता की, कामाची व त्यानुसार कार्यपद्धतीची व्याप्ती वाढलेली आहे. जेव्हा तुम्ही एखाद्या कार्याची अंमलबजावणी करताना केवळ अटी आणि नियमांना अनुसरून काम करता. तेव्हा आपण प्रशासकीय प्रवृत्तीचे प्रदर्शन करीत असता. तुमच्या कामाचा दृष्टिकोन संकुचित असतो. नोकरशाही संरचनेत बसणारे आहे ज्यात कोणीही त्याच्या संरक्षित क्षेत्रात (comfort zone) किंवा संकुचित मनोवृत्तीच्या बाहेर येण्यास तयार नसतो. बऱ्याच बाबतीत आपण कृती करण्यासाठी सूचनांची प्रतीक्षा करतो आणि स्वतःच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेचा वापर करीत नाही. जेव्हा आपण आपल्या शहाणपणाचा उपयोग विविध सहशालेय उपक्रम आणि विभागाचे पर्यवेक्षण करून आपली शाळा सुलभपणे चालण्यासाठी करतो, तेव्हा आपण प्रशासनाच्या मर्यादेला ओलांडून पलीकडे व्यवस्थापक म्हणून अधिक काम करायला लागतो. तथापि नेतृत्वाची भूमिका याही पलीकडे जाते.

## नेता/नेतृत्व :

चांगल्या पद्धतीने संघाची बांधणी केलेल्या प्रेरित संघासह सहयोगी दृष्टीचा विकास करणे आणि कृतीद्वारे दृष्टी रुजविण्याचा प्रयत्न करणे. एक असे वातावरण तयार करणे जेथे सहयोगी मानवी संबंध प्रोत्साहित केले जातात, संघ बांधणी आणि नेतृत्व, संघा द्वारे केलेल्या प्रयत्नांना पाठींबा मिळतो. जो स्वतःच्या कृतीद्वारे आणि सहयोगी वातावरणाची निर्मिती करून प्रेरणा देतो.

शाळा प्रमुख म्हणून अनेक भूमिका व जबाबदाऱ्या हाताळतांना तुमच्याकडे ही समज विकसित होण्यास खूप वाव आहे. या सुरुवातीच्या चर्चेच्या आधारे आपण शाळा नेतृत्व बद्दलच्या आपल्या धारणेबद्दल विचार करू.

नेतृत्व कर्त्याने बदलाकरिता सुयोग्य वातावरण निर्मितीसाठी नेतृत्व प्रदान करताना प्रशासकांनी व्यवस्थापकाच्या भूमिकेच्या पलीकडे जाणे अपेक्षित आहे. एक यशस्वी नेतृत्वकर्ता होण्यासाठी आपल्याला बोल्स आणि जेम्स डेव्हनपोर्ट (1975) यांनी प्रस्तावित केलेल्या घटकसंचामध्ये स्पष्ट केल्यानुसार चार ध्येय प्राप्त करावी लागतात.




आपल्या शाळेचे प्रशासन, व्यवस्थापन व सनियंत्रण करत असताना वरील आकृती दर्शवते की, आपण शाळा प्रमुख/व्यवस्थेतील पर्यवेक्षकीय घटक होण्यासाठी वरील चारही ध्येये गाठावी लागतील. विद्यार्थी व शिक्षकांची गुणवत्ता राखणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शाळेचा निकाल, शिक्षकांची नियमितता आणि वक्तशीरपणा आणि शिक्षकांकरिता व्यावसायिक विकासाच्या संधी, संदर्भ साहित्यासह सुसज्ज ग्रंथालय इत्यादी शालेय उपक्रम योजना अंमलात आणत असला तर तुम्ही दावा करू शकता की, ध्येय एक व दोन आपण साध्य केलेले आहे. ध्येय तीन पूर्ण केले असा दावा तेच करू शकतात, जे बदलांकरीता पुढाकार घेतात आणि नवकल्पनांची अंमलबजावणी करू शकतात. ज्यांनी शिक्षक आणि संस्थेच्या (शाळा) व्यावसायिक विकासाच्या आकांक्षा पूर्ण करण्यात यश मिळविले आहे व जेथे हे दोन्ही घटक परस्परपूरक आणि एकाच वेळी प्रगती करीत आहेत, त्या ठिकाणी आपण ध्येय चार साध्य करण्यात यशस्वी झालात असे म्हटले जाऊ शकते. तुमचे प्रयत्न पहिले दोन ध्येयापर्यंतच मर्यादित असतील तर तुम्ही प्रशासक आहात. यशस्वी नेतृत्वकर्ता होण्यासाठी तुम्हालाही ही रेषा पार ओलांडलीच पाहिजे. काही जण प्रथम तीन ध्येये साध्य करून यशस्वी नेतृत्व करत असल्याचा दावा करू शकतात, मात्र ते बहुतेक प्रशासक असतात आणि फारच कमी हे ध्येय चारचे लक्ष्य गाठू शकतात. अधिक माहितीकरिता 'Change Leadership' या लिंकमध्ये दिलेला व्हिडिओ अभ्यासावा.

Check video link in audio-visual resources on Change Leadership and School Improvement

## शालेय नेतृत्व :

### विविधांगी भूमिका व जबाबदाऱ्या :

शाळेचा नेता म्हणून विविध भूमिका व जबाबदाऱ्या तुमच्याकडे असतात. शेजारील आकृतीवरून शालेय नेता म्हणून तुमच्या सात मुख्य भूमिका व जबाबदाऱ्या लक्षात येतील. शाळाप्रमुखांचा विकास आणि शाळांचा कायापालट घडवून आणण्यासाठी आवश्यक उद्दिष्टे आणि आशयविषयक बाबी प्रमुख क्षेत्रांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत.




शाळांचा कायापालट आणि शाळाप्रमुखांची चिकित्सक भूमिका यांचा समग्र दृष्टिकोन तयार करण्यासाठी या सात क्षेत्रांची सांगड बारकाईने घालण्यात आली आहे. या आराखड्यामध्ये शाळा ही अध्ययनाची एक संघटित संस्था आहे. जेथे बालकांचे संगोपन कृतिप्रवण राहून केले जाते आणि त्यांच्या सर्वांगीण विकासास मदत होते, असा विचार करण्यात आला आहे. शाळा प्रमुखांस सकारात्मक, स्वयं-कल्पना (स्वयं-प्रतिमा) विकसित करणे आणि चिंतनशील व्यावसायिक

बनण्यास प्रोत्साहन देणे, समानता आणि भेदभावविरहित असलेल्या मूल्यांचे मार्गदर्शन करणे या बाबी अभ्यासक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. वैविध्यपूर्ण भारतीय शालेय संदर्भ लक्षात घेऊन, या अभ्यासक्रमामध्ये विशिष्ट लक्ष द्यावयाच्या क्षेत्रांची अधिक माहिती व्हावी व जाणीव वृद्धिंगत व्हावी यासाठीची सोय करण्यात आली आहे. डोंगराळ, वाळवंटी आणि आदिवासी क्षेत्रे, अत्याधिक पाऊस पडून पूर येतो असे विभाग, जेथे सामाजिक संघर्ष किंवा नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तींचा उद्‌भव होतो अशा सर्व बाबी समजून घेऊन आव्हानास तोंड देण्यासाठी अभ्यासक्रमात विचार करण्यात आला आहे. लहान तसेच विविध स्तरीय शाळांना भेडसावत असलेल्या आव्हानांकडेही तेवढेच लक्ष देण्यात आले आहे.

Check video link in audio-visual resources on School as a Learning Organisation

## 'स्व' चा विकास :

या भूमिकेचे मुख्य लक्ष याकडे असते की, स्वतःमध्ये तसेच शिक्षक, कर्मचारीआणि विद्यार्थी यांच्यातील क्षमता, दृष्टिकोन आणि मूल्ये याबाबत त्यांच्यात स्व-संकल्पना विकसित करणे. या भूमिकेमध्ये स्वतःची आणि इतरांची शिकण्याची व विकसित होण्याची सतत संधी शोधण्यासाठी तुम्हाला स्वतःमध्ये चिंतन आणि आंतरक्रियेतून सुधारणा करीत रहावे लागेल. त्यासाठी नेतृत्वकर्त्याची इतरांना विकासासाठी संधी उपलब्ध करून देण्यात चिकित्सक भूमिका महत्त्वाची ठरते. यात गतिशील नेतृत्वासाठी 'स्व' विकासाकरिता एक प्रकारे स्वतः गुंतवणूक करणे गरजेचे असते.

स्वतः शिकण्याचा एक मार्ग म्हणून सतत चिंतनाचा सराव करणे आवश्यक आहे. असा विश्वास आहे की, कृती आधारित चिंतनाच्या केलेल्या सरावातून शाळेत नेतृत्वकर्ता इच्छित बदल घडवून आणण्यासाठी अधिक सक्षम बनवितात, ज्यामुळे होय, मी करू शकतो! अशी वृत्ती विकसित होते. जेव्हा एखाद्या आव्हानाचा सामना करावा लागतो आणि यातूनच परिणाम घडून शाळेमध्ये विकासात्मक बदल होतो. ही भूमिका समजून घेतली तर शाळा बदलाची जबाबदारी घेण्याचे ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. व्यावसायिक 'स्व' विकासाचा मार्ग सुरू करण्यासाठी लिंक मध्ये दिलेला ऑडिओ - व्हिज्युअल व्हिडिओ अभ्यासावा.

Check video link in audio-visual resources on Professional Development Plan

## अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुधार/रूपांतरण

या भूमिकेचे महत्त्व म्हणजे शाळेत अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुधार, रूपांतरण करणे होय. ज्यायोगे वर्ग प्रक्रिया ही अधिक विद्यार्थी केंद्रित होईल. त्यामुळे शाळा प्रमुखांना शिक्षणाचा हेतू समजण्यास आणि विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण परिपूर्ण होण्याच्या दिशेने विद्यार्थ्यांची नोंदणी, प्रवेश, टिकवणूक तसेच मुलांनी शाळेत का यावे, अध्यापनाची प्रक्रिया कशी असावी यासारख्या मुद्द्यांवर चिंतन करण्यास व प्रतिक्रिया नोंदविण्यास सक्षम करते. नेतृत्व करण्याची भूमिका मुलांच्या विकासाच्या गरजेवर भर देते आणि विविध अनुभवात्मक उपक्रमांच्या माध्यमातून मुलांच्या गरजा समजून घेण्यासाठी शाळांमध्ये संवेदनशीलता विकसित करण्याचा प्रयत्न करते. ही प्रक्रिया याबाबत सुद्धा अधिक लक्ष देते की, आपल्यात कौशल्य विकसित होईल की ज्याद्वारे शाळा प्रमुख शाळेतील संबंधित महत्त्वाच्या प्रक्रियेमध्ये जसे की, वर्गाचे निरीक्षण, शिक्षकांना अभिप्राय देणे व मार्गदर्शक आणि सदुपदेशक (coach आणि Mentor) म्हणून पार पाडतील. या भूमिकेचा महत्त्वाचा हेतू तुम्हास सक्षम बनविणे ज्याद्वारे शाळेतील प्रत्येक मूल स्वतःला स्वतंत्र, महत्त्वाचे व आदरार्थी समजून स्वतःबद्दल आणि वातावरणाबद्दल नवीन गोष्टी शिकण्यासाठी रोज नियमित शाळेत येण्यास प्रवृत्त करेल. 'शाळा आणि शिक्षणाचा उद्देश' हा लिंकमध्ये दिलेला व्हिडिओ अभ्यासावा.

Check video link in audio-visual resources on School and Purpose of Education

### संघ बांधणी आणि नेतृत्व :

शाळा एक असा घटक आहे, जिथे सर्व सदस्य निश्चित केलेल्या ध्येयाकडे एकत्रितपणे, तीव्रतेने कार्य करतात. हे सर्व प्रभावीपणे होण्यासाठी संघ बांधणी करणे व त्यांचे नेतृत्व करणे यात शाळा प्रमुखांची महत्त्वाची भूमिका निर्माण होते. सांघिक कार्य केवळ शाळेच्या सुयोग्य कार्यप्रणालीत व कामकाजात मदत करत नाही तर प्रत्येक सदस्याची क्षमता आणि कौशल्य देखील विकसित करते. त्यामुळे चांगल्या कल्पनांच्या आदान–प्रदान आणि समस्या व आव्हाने यांना सामोरे जाण्याचे नावीन्यपूर्ण मार्ग समोर येतात. ही भूमिका प्रभावी संघ तयार करून टिकविण्यासाठी आवश्यक मूल्य आणि कौशल्य यावर भर देतात. तुम्ही संघाची बांधणी करताना विचार करू शकता की, सदस्यांची सहभागिता, संघ गतिशीलता, मतभेदांचे प्रभावी निवारण, संप्रेषण या प्रक्रियेचे कसे नेतृत्व करू शकाल आणि त्याचवेळी संघ सदस्यांसाठी व्यवसाय विकासाच्या संधी कशी निर्माण करू शकतो.

### नवोपक्रमांचे नेतृत्व :

Check video link in audio-visual resources on Knowing More about Innovations

कोणत्याही संस्थेतील नावीन्यपूर्ण विचारांना समस्या योग्यरीतीने सोडविण्यासाठी आणि बदल घडवून आणण्यासाठी संभाव्य प्रभावी मार्ग म्हणून बघितले जाते. मात्र केवळ समस्यांचे निराकरण करण्यासाठी नावीन्यपूर्ण कल्पनांचा वापर केला जाऊ नये तर  सर्व सदस्यांना सामील करून घेण्यासाठी आणि शाळेत समाविष्ट असलेल्या कार्यपद्धतींना प्रोत्साहित करण्यासाठीची बाब म्हणून पाहिले जाऊ शकते. नावीन्यपूर्ण विचार लोकांना जोखीम घेण्यास, विचारांचा आनंद घेण्यात आणि दृढ निश्चयाने वागण्यासाठी प्रोत्साहित करतात. 'होय, मी करू शकतो' या वृत्तीने कार्य करण्याचा आत्मविश्वास देतात. नावीन्यपूर्ण पद्धतीने अध्ययन ही एक नैसर्गिक प्रक्रिया बनते, म्हणून शाळा प्रमुखाची महत्त्वपूर्ण भूमिका म्हणून हे बघितले जाते. शाळांना अध्ययनशील संस्था म्हणून परावर्तीत करण्यासाठी पुढाकार घेऊन शाळांमध्ये नावीन्यपूर्ण कल्पना व विचार संस्कृती रुजविणे महत्त्वाचे आहे. नावीन्यपूर्ण कल्पना व विचार केवळ मुलांसाठीच नव्हे तर शिक्षक, पालक, शाळा व समाजासाठी देखील आनंददायक बनू शकते. नावीन्यपूर्ण कल्पनाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी लिंकमधील व्हिडिओ अभ्यासावा.

### भागीदारीचे नेतृत्व :

विविध सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी असलेली मुले त्यांच्या वेगवेगळ्या अनुभवांसह शाळेत येतात. जेव्हा त्यांच्या सामाजिक आणि भावनिक गरजा पूर्ण केल्या जातात, तेव्हाच ते शाळेशी जुळून अधिक चांगल्या प्रकारे शिकतात. 'प्रत्येक मूल शिकू शकेल' याची खात्री करण्यासाठी पालकांना आणि समाजाला तसेच इतर भागधारकांना सहभागी करून शाळांना आपल्या विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करण्याची संधी आहे. तुमची ही भूमिका आपल्याला स्थानिक समुदायासह, पालक, समुदायातील सदस्य व व्यवस्थेतील इतर पर्यवेक्षकीय यंत्रणेसह शाळेसोबत भागीदारी तयार करण्यास मदत करते.

### शाळा प्रशासनाचे नेतृत्व :

ही भूमिका शाळेचे नेतृत्व करण्याच्या प्रशासकीय आणि आर्थिक बाबींवर केंद्रित असते. हे आपल्याला संबंधित राज्य सरकारांनी तयार केलेले प्रशासकीय नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे, तसेच शाळेतील वित्तीय अर्थसंकल्पीय आणि निधीच्या वापराची समज विकसित करण्यास प्रोत्साहित करते. शाळेचे नेतृत्व करत असताना भौतिक आणि मानवी संसाधनाचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे आणि हे क्षेत्र संसाधनांचा प्रभावी वापर करण्याचे विविध आयाम शोधून काढते. शाळा प्रमुखाची ही भूमिका देखील महत्त्वपूर्ण आहे कारण शाळा प्रमुखाच्या या भूमिकेचा उपयोग करून निर्णय घेणे व त्याद्वारे शाळेच्या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास मदत करते, परंतु त्यातील एक महत्त्वाची भूमिका म्हणजे तुम्ही अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत सुधारणा करणे आणि प्रत्येक मूल शिकेल याची खात्री करणे. चला यातील संबंधाचे परीक्षण करू या.

## विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी शाळा प्रमुखाच्या नेतृत्वाचे महत्त्व :

विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर प्रभाव टाकणारा शिक्षकांच्या गुणवत्तेनंतर सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शाळा प्रमुखाचे नेतृत्व.
– *रोबिन्सन (2008)*

शिक्षकांनी प्रभावीपणे शिकविण्याकरिता शाळाप्रमुख तसे वातावरण तयार करू शकतात. जसे की, पुरेसा कर्मचारी वर्ग आणि संसाधने यांची सुनिश्चिती करणे, विद्यार्थ्यांना घडविणारे म्हणून विकसित होत जाणारी शालेय संस्कृती तयार करणे, संघ तयार करणे, सर्व विद्यार्थ्यांच्या यशस्वी होण्याच्या दृष्टीने भविष्यवेधी दृष्टी देणे, इतरांमधील नेतृत्वाला प्रोत्साहित करणे आणि शिक्षकांना त्यांचे कौशल्य सुधारण्यासाठी मदत करणे. विविध डेटा (माहिती) सुयोग्य पद्धतीने वापरणे. ते शिक्षकांना त्यांची अध्यापनाची पद्धती अधिक चांगली करण्यास व वर्गाध्यापनात नवनवे प्रयोग करण्यास प्रोत्साहित करावे. जेव्हा शाळा एखाद्या आव्हानात्मक परिस्थितीत काम करत असते, तेव्हा त्या व्यवस्थेत बदल होणे आवश्यक असते. अशावेळी शाळाप्रमुखाचे नेतृत्व सर्वात महत्त्वाचे असते. थोडक्यात यशस्वी शाळा नेतृत्व हे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये सहभागी दृष्टी विकसित करण्यात, ध्येय निश्चिती, अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत सुधारणा, निर्धारित निकाल साध्य करण्यात आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुनिश्चिती करण्यात निरंतर गुंतलेले असतात.

## विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम करणारे शालेय नेतृत्व

विविध संकल्पनात्मक मॉडेल्स (रोबिन्सन 2008) यांनी त्यांच्या संशोधनाप्रमाणे शालेय नेतृत्वाचे चार प्रकारचे परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होतात असे मांडले आहे. 1. थेट प्रभाव, 2. मध्यम प्रभाव, 3. व्यस्त प्रभाव, 4. परस्पर प्रभाव या भागात आपण पहिल्या तीन प्रभावावर चर्चा करणार आहोत की, जे आपल्या संदर्भात अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

### 1. थेट प्रभाव :

शालेय नेतृत्वाचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रभाव होतो असे मानले जाते. (आकृती क्रमांक 1 पहा) तथापि या प्रकारचा प्रभाव अशा ठिकाणी अधिक स्पष्टपणे दिसून येतो, जेथे शाळा प्रमुख शिक्षकांना पाठबळ आणि सदुपदेशन (mentoring) आणि सोबतच्या काही वर्गात प्रत्यक्ष अध्यापन करीत असतात, जेणेकरून मुले शिकावीत. शाळाप्रमुख संपूर्ण शाळेत प्रेरणादायी, आनंददायी वातावरणाची निर्मिती करून वर्गांमध्ये परिणामकारक अध्ययन–अध्यापन प्रक्रियेची खातरजमा करतो.

**शालेय नेतृत्व** → **विद्यार्थ्यांचे अध्ययन**

*आकृती क्रमांक 1 : प्रत्यक्ष प्रभाव.*

### 2. मध्यम प्रभाव किंवा अप्रत्यक्ष प्रभाव :

मध्यम प्रभावात शालेय नेतृत्वाच्या परिणामाखेरीज इतर दोन किंवा अधिक चलांचा देखील विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होत असतो. उदा. शाळा प्रमुखाचे नेतृत्व हे शिक्षकाच्या गुणवत्तेद्वारा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर प्रभाव पाडतात. (आकृती क्रमांक 2) इतर अनेक पर्यवेक्षण करणारे नेतृत्व जसे सीआरसी, बीआरसी जे शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शैक्षणिक सहाय्य देतात यांचाही मध्यम प्रभाव पडू शकतो.


**शालेय नेतृत्व** → **शिक्षकांचा व्यावसायिक विकास** → **विद्यार्थ्यांचे अध्ययन**

*आकृती क्रमांक 2 : मध्यम प्रभाव किंवा अप्रत्यक्ष प्रभाव.*

### 3. व्यस्त प्रभाव :

शालेय नेतृत्व विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम करते आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनामुळे शालेय नेतृत्व प्रभावित होते. या व्यस्त प्रभावासाठी आकृती क्रमांक 3 मधील बिंदूयुक्त रेषांचा संदर्भ पहा. शालेय नेतृत्वाच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तरांमध्ये बदल होत आहेत, ही बाब आकृतीमधील पुढील दिशेने असणारे बाण दर्शवितात. आकृती 1 व 2 मध्ये आपण हा संबंध आधीच

बघितला आहे. व्यस्त प्रभावात शाळा प्रमुख आणि शिक्षक हे बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित असतात. तथापि शाळा प्रमुखाने प्रयत्न करूनही काही विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तरात भिन्नता असू शकते आणि काही मुले अजूनही त्यांच्या श्रेणीतील कौशल्यापेक्षा कमी कामगिरी करू शकतात. दुसऱ्या शब्दात, विद्यार्थ्यांची कमी असलेला अध्ययन स्तर असे सूचित करू शकतो की, शाळा प्रमुख आणि शिक्षकांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. ही बाब शाळा प्रमुखांना आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर सुधारण्यासाठी, त्यांची कार्यपद्धती, प्रक्रिया, धोरण, योजना, उपक्रम बदलण्यासाठी प्रत्याभरणाचे काम करते. ही बाब आकृतीमध्ये मागे जाणाऱ्या खुणेने दर्शविली आहे. म्हणूनच या प्रकरणात शालेय नेतृत्व आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन यांच्यातील संबंध व्यस्त प्रभावाचे असल्याचे दिसते आहे.




आकृती 3 : व्यस्त प्रभाव

## विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील सुधारणेसाठी शैक्षणिक नेतृत्व :

शैक्षणिक नेतृत्व म्हणजे शालेय अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये बदल घडवून आणण्यासाठी ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोन यांचा एकत्रित संच अशाप्रकारे दर्शवितो की,

1. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुधारणे आणि सुधारणेच्या प्रक्रियेमध्ये योगदान देणे.
2. शिक्षकांचा व्यावसायिक विकास, शैक्षणिक नेतृत्वाची भूमिका स्वीकारणारा एका शाळेचा प्रमुख ठामपणे विश्वास असावा की, प्रत्येक मूल शिकण्यासाठी, प्रगत करण्यासाठी सक्षम आहे आणि त्यांचे शिक्षक अध्यापन पद्धती, प्रक्रिया, ज्ञान आणि कौशल्य यात सुधारणा घडवून आणू शकतात. शैक्षणिक नेतृत्व करणारा शाळा प्रमुख शिक्षकांच्या अध्यापन प्रक्रियेचे तसेच वर्गातील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे सुद्धा समर्थन आणि पर्यवेक्षण करतो. आपल्याला हे देखील माहीत आहे की, एक प्राथमिक शिक्षक, उच्च प्राथमिक किंवा प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक किंवा शाळा प्रमुख देखील वर्गातील अध्यापनात गुंतलेले असतात. म्हणून हे समजून घेणे आवश्यक आहे की, तो/ती एक शिक्षकासोबतच एक शाळा प्रमुख सुद्धा आहे. शाळा प्रमुख शिक्षक म्हणून काम करीत असल्याने त्याला शिक्षकाच्या भूमिकेची, त्याच्या विविध अडचणी व आव्हानांची जाणीव आहे. जसे की विविध गरजा असलेल्या मुलांच्या समस्या, विविध अध्ययन स्तरावर असलेली मुले. या व्यतिरिक्त शाळा प्रमुखांनी आपल्याला प्रत्येक वर्गात आणि सर्व विषयांमधील एकंदर अध्यापनाची पद्धती सुधारण्यासाठी शाळेतील शिक्षकांना सहकार्य, पाठिंबा व परीक्षण करण्याची संधी देणे आवश्यक आहे. शैक्षणिक नेतृत्व कर्त्याची भूमिका अधिक स्पष्टपणे व सविस्तर समजण्यासाठी आपल्याला तीन घटकांचे विस्तृतपणे आकलन होणे गरजेचे आहे.

- कृतिशील अध्ययन तत्त्वांवर आधारित दृष्टिकोन विकसित करणे.
- शाळाप्रमुख म्हणून अध्यापन शास्त्रातील घटकांच्या ज्ञानाचे आकलन होणे.
- शाळेतील शैक्षणिक पर्यवेक्षण

## कृतिशील अध्ययन तत्वांवर आधारित दृष्टिकोन विकसन :

विद्यार्थ्यांचे अध्ययन हे भयमुक्त शालेय वातावरणात घडले पाहिजे. मुलांना त्यांची जास्तीत जास्त क्षमता मिळवून देण्यासाठी, त्यांच्यात चिकित्सक विचार करण्याचे कौशल्य व चौकस वृत्ती वाढीसाठी आवश्यक ते वातावरण व संधी मिळावयास पाहिजे. जेथे मुलांना सुरक्षित आणि आश्वस्त वाटेल असे शिक्षणाचे वातावरण आपण कसे निर्माण करू शकता? चिकित्सक विचार करण्याचे कौशल्य आणि चौकस वृत्ती कशी वाढीस लागेल याचे उत्तर म्हणजे पारंपरिक पाठांतर पद्धतीच्या अध्ययनापासून दूर राहणे होय. ज्यामध्ये

मुलांना शिकण्याचा, अध्ययनाचा आनंद मिळेल. अशा प्रकारची अध्ययनाची पद्धत असेल, जिथे शिकण्याचा केंद्रबिंदू मूल असेल, जिथे मुले केवळ अध्यापनाचे श्रवण करत नाही, तर त्याऐवजी ते उच्च विचार करण्याच्या प्रक्रियेत गुंतलेले असतील त्यालाच बालकेंद्री अध्यापन पद्धती म्हणतात. पारंपरिक व पाठांतरावर आधारित अध्यापन पद्धती ज्यात शिक्षक माहिती पुरवतात. मात्र बालकेंद्री अध्यापनामुळे कार्यक्षम नागरिक तयार होऊन समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देऊ शकतो.

Check video link in audio-visual resources on Young Historians

शिक्षक हे ज्ञानाचे सुलभक म्हणून कृती करतात. मुलांना माहिती शोधण्यास, प्रक्रिया करण्यास आणि त्याच्यावर अंमलबजावणी करण्यास प्रवृत्त करतात. बालक केंद्रित अध्यापनशास्त्रातील एक घटक कृतिशील अध्ययन हा होय. त्यामुळे अध्ययन–अध्यापन प्रक्रिया अधिक आनंददायक आणि अर्थपूर्ण बनते. एक शालेय नेतृत्व म्हणून आपणास कृतिशील अध्ययन–अध्यापन प्रक्रियांची सखोल समज असणे आवश्यक आहे. जे सर्व विषयाच्या घटकांमध्ये सर्वसामान्यपणे समाविष्ट झालेली आहेत. दिलेल्या संदर्भामध्ये उपलब्ध लिंकद्वारे कृतिशील अध्ययन बाबतचा व्हिडिओ आपण अभ्यासू शकता. या व्हिडिओचा अभ्यास केल्यावर खालील तक्त्याचे अवलोकन करावे व निष्क्रिय अध्ययन व सक्रिय अध्ययन यातील फरक पहावा. वर्ग अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये आपण आपल्या शिक्षकांना सक्रिय अध्ययन तत्त्व वापरण्यास कसे प्रशिक्षित करू शकता यावर प्रतिक्रिया व्यक्त करा.

| निष्क्रिय अध्ययन | सक्रिय अध्ययन |
|---|---|
| शिक्षक व मूल त्यांच्या अध्ययनाच्या सर्वसाधारण सिद्धांताच्या बाबींमध्ये गुंतलेले असतात. | विद्यार्थी ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भाने वाढला आहे याची जाणीव शिक्षकांमध्ये असते. शिक्षक अध्ययनार्थ्यास तात्त्विक माहितीच्या संकलना सोबतच प्रत्यक्ष जीवनाशी निगडित बाबींच्या अध्ययनामध्ये अनुभव घ्यावयास लावतात. |
| ज्ञानाला अध्ययनार्थीच्या बाहेर असलेले असे समजले जाते, जे त्याला प्राप्त करायचे आहे. | चिकित्सक, चौकस अध्ययनाद्वारे वैयक्तिक आणि सामाजिक अनुभवातून प्राप्त झालेल्या ज्ञानाची जोपासना करते. |
| चिंतन आणि स्वयंअध्ययन फार कमी वाव | शिक्षक मुलांना सखोल चर्चा आणि चिंतन करावयास सांगतात. त्यांना स्वयंअध्ययन आणि चिकित्सक विचाराच्या आधारे मुद्दे शोधण्यास आणि त्याबाबत स्पष्टीकरण देण्यास प्रोत्साहित करतात. विद्यार्थी चिकित्सक जर्नल्स द्वारा यांचे निरीक्षणे, चिकित्सा, त्यांचे मतभेद सुद्धा प्रदर्शित करतात. |
| विद्यार्थी स्वाध्याय, गृहपाठ, क्षेत्रभेट आणि अध्यापनाचा सराव यावर स्वतंत्रपणे काम करतात. | विद्यार्थ्यांना संघात काम करण्यास, एकमेकास सहकार्य व आंतरक्रिया करण्यास, विविध विषय घटकांवर प्रकल्प राबविण्यास प्रोत्साहित केले जाते. गट सादरीकरण करण्यासाठी सुद्धा प्रोत्साहित केले जाते. |
| विद्यार्थ्यांमधील सामाजिक वास्तविकतेविषयी धारणा तसेच अध्ययन आणि अध्ययन प्रक्रिया याबाबत कोणताही वाव नसतो. | समाजातील स्वतःचे स्थान या विषयाचे मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेसा वाव दिला जातो. विद्यार्थ्यांची मते व दृष्टिकोन यांना पुरेशी संधी वर्ग अध्यापना दरम्यान मिळते. |

| निष्क्रिय अध्ययन | सक्रिय अध्ययन |
|---|---|
| विषय ज्ञानाच्या संकल्पनेची तपासणी करण्यासाठी वाव नसतो. | प्रत्येक संकल्पनेच्या परिपूर्तीसाठी पुनर्भेट, परीक्षण आणि ज्ञानाबाबतच्या चुकीच्या संकल्पनाबाबत आव्हानाला आव्हान देण्यास पुरेसा वाव दिला जातो. |
| पाठांतर पद्धतीला प्रोत्साहित केले जाते आणि मूल्य–शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. | पाठांतराची पद्धती नाकारून अध्ययन हे अधिक आनंददायी आणि कृतिशील सहभाग द्वारे तसेच अध्ययनार्थी केंद्रित, कृती केंद्रित, सहभागी अध्ययन अनुभव, नाटिका, प्रकल्प, चर्चा, संवाद, परिसंवाद, निरीक्षण, भेटी, समग्र उत्पादनक्षम कामासह, शैक्षणिक अध्ययन, शांततेच्या मूल्याला प्रोत्साहित केले जाते. लोकशाही पद्धतीचे जीवन, समता आणि समानता, न्याय, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक पुनर्रचना संबंधीची कृतीयुक्त ओढ इत्यादी बाबींचा समावेश होतो. |

*(मूळ स्रोत एनसीएफटीई 2009, http://ncte-india.org/ncte_new/pdf/NCFTE_2010.pdf)*

## शाळा प्रमुख म्हणून अध्यापनशास्त्रीय आशयज्ञानाची समज :

याआधीच्या भागात सक्रिय अध्ययन–अध्यापन प्रक्रियेबाबत आपले उद्बोधन केलेले आहे. ज्याचे वर्गीकरण करता येऊ शकते. पुढील भागात आपण अध्यापनशास्त्राची सर्वसामान्य तत्त्वे, अध्यापनशास्त्रातील घटकाचे ज्ञान, अध्ययन निष्पत्ती आणि शाळा आधारित मूल्यमापन याबाबत अधिक जाणून घेणार आहोत. या तीन घटकांचा अभ्यास करण्यासाठी आणि स्वतःमध्ये शैक्षणिक नेतृत्व विकसित करण्यासाठी ज्या ज्ञान व कौशल्याची गरज आहे ते विकसित करण्यास मदत होईल. 'अध्यापनशास्त्रीय घटकांचे आशयज्ञान' हे साध्या परिभाषेत सांगायचे तर हे अध्यापनशास्त्रातील विविध तत्त्वांचे मिश्रण आहे. जे विषयानुसार त्यातील प्रत्येक घटकांशी नेमकेपणाने वर्गीकृत केलेले आहे. तथापी PCK (Pedagogical Content Knowledge) अर्थात 'अध्यापनशास्त्रीय घटकांचे आशयज्ञान' हे एवढेच मर्यादित अर्थाने येत नाही तर यामध्ये शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीतील विविधता तसेच मुलांच्या अध्ययनातील विभिन्न गरजा इत्यादी बाबत सखोल समज वाढविणे अंतर्भूत आहे. जेणेकरून प्रत्येक मुलाच्या अध्ययन वाढीसाठी अध्ययन–अध्यापन प्रक्रियेला त्यांच्या गरजेनुरूप रचता येईल.

## सामान्य अध्यापनशास्त्राचे आशयज्ञान :

यामध्ये मूल ज्ञानाची रचना कशी करते (उदाहरणार्थ सक्रिय अध्ययन तत्त्वानुसार) आणि परिसरातील ज्ञानाचे अध्ययन–अध्यापनाची योजना, वर्ग व्यवस्थापन, अध्ययनार्थी बद्दलचे ज्ञान समाविष्ट आहे.

## विषय ज्ञान :

यात विषयाच्या किंवा विविध शाखांच्या घटकांच्या माहितीचा समावेश आहे.

## अध्यापनशास्त्रीय ज्ञान :

हे लक्षात घेणे गरजेचे आहे की एखाद्या विषयाला कसे शिकवायचे यांचा संकल्पनात्मक मार्ग यांच्याशी संबंधित आहे. ज्यात विविध विषयासाठी अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया, दिशा व रचना यांचे ज्ञान आणि त्यासंबंधीचे उदाहरणे संकल्पना स्पष्ट करण्यासाठी याचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांचे आकलन आणि विषयासंदर्भातील चुकांची समज इत्यादीबाबत विद्यार्थ्यांच्या आकलनासंबंधी असलेले

गैरसमज दूर करण्यासाठी शिक्षकांनी प्रश्न विचारणे, विचारपूस करणे, वैचारिक स्पष्टता आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रियेबाबत वर्गातील विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची विविधता लक्षात घेणे इत्यादी बाबी समाविष्ट आहेत.

विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक, भाषिक पार्श्वभूमी, आवड, अध्यानार्थीची गरज, तंत्रे आणि साधने जी शाळा आणि वर्गात अध्ययनासाठीच्या सकारात्मक वातावरणाची निर्मिती असावी असे सांगते. वेगवेगळ्या विषयाविषयी इतर सखोल शैक्षणिक माहिती जाणून घेण्यासाठी आपण NCERT निर्मित वेबसाईट (www.itpd.endert.gov.in) या वर उपलब्ध विविध विषयासंबंधीच्या घटकसंचाची माहिती करून घेऊ शकता.

### विषयाचे अध्यापनशास्त्रीय घटक आशयज्ञान :

- पर्यावरण शास्त्राचे अध्यापनशास्त्र
- विज्ञान विषयाचे अध्यापनशास्त्र
- गणित विषयाचे अध्यापनशास्त्र
- सामाजिक शास्त्राची अध्यापनशास्त्र
- भाषा विषयाचे अध्यापनशास्त्र

शाळा प्रमुख म्हणून आपल्याला आपल्या शाळेतील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे पर्यवेक्षण करण्यासाठी वेगवेगळ्या विषयांच्या अध्यापनशास्त्रातील घटकांच्या ज्ञानाचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे. हे शक्य आहे की प्राथमिक स्तरावर (प्राथमिक/ उच्च प्राथमिक) आपल्याकडे मर्यादित शिक्षकांसह एक लहान शाळा असेल अशा परिस्थितीत आपल्या शिक्षकांसह आपण वर्गात अध्यापनासाठी अधिक वेळ घालवीत असाल. म्हणूनच इतर शिक्षकांइतकेच आपल्याला विषय घटकांचे सखोल ज्ञान होणे महत्त्वाचे आहे. वर दिलेल्या घटकसंचामध्ये तुम्हाला असे आढळले कि प्रत्येक विषयासाठी ग्रेडनिहाय अध्ययनाच्या निष्पत्ती निश्चित केलेल्या आहेत. आपल्या शाळेतील अध्ययन – अध्यापन प्रक्रियेतील सुधारणा सुद्धा विद्यार्थ्यांना नवीन अध्ययनास, शिकण्यास वाव देते. त्यामुळे शिकणे गतिशील होते. तथापी विद्यार्थी खरोखरच विशिष्ट विषयातील ज्ञान, कौशल्य आणि क्षमता प्राप्त करीत आहेत का? याचे मूल्यमापन करण्यासाठी आपणास श्रेणी आणि गुणांच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे. यासाठी आपण अध्ययन निष्पत्ती आणि शाळा आधारित मूल्यमापन या संकल्पना समजून घेऊया.

### अध्ययन निष्पत्ती म्हणजे काय :

या दृष्टीने पाठांतर पद्धतीपासून दूर जाऊन अध्ययन निष्पत्ती आधारित मूल्यमापनावर जोर देण्यात आलेला आहे. सर्व शिक्षकांना तसेच व्यवस्थेतील पर्यवेक्षीय यंत्रणेला ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक, वैयक्तिक गुण आणि दृष्टिकोन बदलण्याच्या बाबतीत विशिष्ट वर्गात वर्षभर अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतून काय साध्य करेल हे समजून घेण्यासाठी NCERT ने अध्ययन निष्पत्ती तयार केलेल्या आहेत. या अध्यापनशास्त्राशी निगडित आहे. अध्ययन निष्पत्ती हे विधान आहेत जी ज्ञान किंवा कौशल्य बद्दल माहिती देतात. ते एखाद्या विशिष्ट वर्गात किंवा अभ्यासक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना प्राप्त करणे आवश्यक आहे आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अध्ययन वाढीसाठी वापरणे गरजेचे आहे.

हे प्रक्रिया वर आधारित विधान आहे. ज्यात समग्र विकासाचे प्रमाण ठरविताना एखाद्या मुलाच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी गुणात्मक किंवा परिणामात्मक पद्धतीने मोजता येण्यासारखे पडताळणीचे मुद्दे पुरविलेले असतात.

परिसर अभ्यास या विषयाचे दोन अध्ययन निष्पत्तीचे उदाहरणासाठी खाली दिलेले आहेत.

- विद्यार्थी वेगवेगळ्या वयोगटातील लोक, प्राणी आणि पक्षी यांच्या अन्नाची गरज, अन्न व पाण्याची उपलब्धता आणि घरात व परिसरात पाण्याचा वापर यांचे वर्णन करतात.

- विद्यार्थी कुटुंबातील सदस्यांची भूमिका कुटुंबांचा प्रभाव (वैशिष्ट्ये/सवयी/प्रथा) एकत्र राहण्याची आवश्यकता (एकत्र कुटुंब पद्धती) या बाबी तोंडी /लेखी /अन्य मार्गाने त्याचे वर्णन करतात.

वरील अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी अध्ययनार्थ्याला गटात, जोडीने, वैयक्तिक स्तरावर काम करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी आणि अवतीभोवतीच्या परिसराचे निरीक्षण करणे, नोंदी ठेवणे आणि त्यांना तोंडी, लेखी, चित्रांच्या हावभावाच्या माध्यमातून सादर करावयास लावणे. मुलांना वडीलधाऱ्या मंडळींशी चर्चा करण्याची, वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देण्याची, त्यांच्या आवडीच्या विषयानुसार त्यांच्याकडून माहिती गोळा करण्याची आणि गटात विश्लेषण निष्कर्षावर चर्चा करण्याची परवानगी असणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावरील अध्ययन निष्पत्ती म्हणजे विशेष गरजा असलेल्या मुलांसह (CWSN) आणि वंचित गटातील मुलांसह सर्व विद्यार्थ्यांना प्रभावी अध्ययनाची संधी प्रदान करणे. या अध्ययन निष्पत्ती अभ्यासक्रमातील विषय जसे – परिसर अभ्यास, विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्र आणि भाषेसाठी तयार केलेले आहेत. या अध्ययन निष्पत्ती अभ्यासक्रमातील अपेक्षा आणि अध्यापनशास्त्रातील प्रक्रियेशी जोडलेले आहेत. वंचित गटातील मुलांसाठी असलेल्या तरतुदींमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. अध्ययन प्रक्रियेत या गटातील मुलांचा सहभाग सुनिश्चित करणे आणि इतर मुलांप्रमाणे त्यांना प्रगती करण्यास मदत करणे, या मुलांची इतर मुलांशी तुलना करणे टाळणे. मुलांच्या वैयक्तिक गरजांप्रमाणे अध्ययनाच्या गरजेप्रमाणे आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम आणि शैक्षणिक वातावरणात सुधारणा करणे.

- वेगवेगळे घटक क्षेत्रानुसार कृतीची तरतूद करणे.
- विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि अध्ययन स्तरानुसार पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.
- वर्गखोल्यांचे योग्य व्यवस्थापन (उदाहरणार्थ वर्गाची रंगरंगोटी, गोंगाट व बाहेरील आवाजात प्रतिबंधित रचना इत्यादी)
- माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) व्हिडिओ आणि डिजिटल स्वरूपातील साहित्य वापरून अतिरिक्त पूरक सहकार्याची उपलब्धता करणे.
- मोबिलिटी साधने (व्हीलचेअर, क्लचेस, पांढरी छडी) श्रवणयंत्र, ऑप्टीकल किंवा नॉनऑप्टीकल साधने, शैक्षणिक साधने (टेलर फ्रेम, अबॅकस इत्यादी) उपलब्ध करणे.
- CWSN मुलांची शक्तीस्थळे आणि कमजोरी याविषयी इतर मुलांना संवेदनशील बनविणे.
- मूल्यमापन यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त वेळ आणि योग्य पर्यायाची निवड करणे.
- मुलांच्या मातृभाषेबद्दल आणि त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक प्रथा परंपरा यांबद्दल आदर राखणे.

– हा उतारा निष्ठा या कार्यक्रमासाठी घटकसंच एक अभ्यासक्रम, अध्ययनार्थी केंद्रित अध्यापनशास्त्र, अध्ययन निष्पत्ती आणि समावेशित शिक्षण पान क्रमांक नऊ – दहा एनसीआरटी मधून घेतलेला आहे.

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अपेक्षित सर्वंकष अध्ययनानुसार मुलांच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी शिक्षकांनी पाठाचे नियोजन करताना विद्यार्थ्यांच्या संदर्भानुसार संसाधने आणि योग्य अध्ययन प्रक्रिया वापरण्याची अपेक्षा केली जाते. विविध प्रकारच्या अध्ययन परिस्थितीत ही समावेशित वर्गात वापरण्यासाठी प्रोत्साहित करायला पाहिजे. तथापि अध्ययन निष्पत्ती या वर्गनिहाय, विषय निहाय असून त्यांचा विद्यार्थ्यांच्या अंगाने एकत्रितपणे विचार करावयाचा आहे, तुकड्या–तुकड्यात नाही. त्याचप्रमाणे अभ्यासक्रमात परिभाषित केलेल्या अध्ययन निष्पत्ती या क्षेत्र, स्तरानुसार समग्र स्वरूपात लक्षात घ्यावयाच्या आहेत. शाळा प्रमुख हे या संबंधीच्या सविस्तर माहितीसाठी अध्ययन निष्पत्ती संबंधीचा घटक संच अभ्यासण्यासाठी एनसीईआरटीच्या वेबसाईटला भेट देऊ शकतात. या ठिकाणी आपणास प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील ग्रेडनिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तीचे घटक संच नुकतेच उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

## शाळा आधारित मूल्यमापन म्हणजे काय?

शाळा आधारित मूल्यमापन हे असे मूल्यमापन आहे ज्यात अध्ययन–अध्यापन प्रक्रिया अंतर्भूत आहे. अध्ययनासाठी मूल्यमापन आणि अध्ययनातील मूल्यमापन या विस्तृत शैक्षणिक तत्वज्ञानावर शाळा आधारित मूल्यमापन शाळांमधील शिक्षकांद्वारा विद्यार्थ्यांचे करण्यात येते. वर्षाच्या अखेरीस मुलांच्या विविध विषयातील कामगिरीचे मूल्यमापन हे सर्वसाधारण बाब आहे. ग्रेड (गुणांच्या आधारे) विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील यशस्वी बाजू किंवा कमतरता आणि त्या कमतरता का आणि कशा आहेत याविषयी कोणतीही माहिती देत नाहीत. आपणास ही जाणीव होण्याची गरज आहे की जेव्हा मुलांची प्रगती मार्कांच्या किंवा ग्रेडच्या स्वरूपात त्यांना सांगितली जाते जसे–अ श्रेणी ब श्रेणी त्यातून त्यांच्यावर ते लेबल बसते. शिवाय वारंवार बाह्य आणि केंद्रिकृत परीक्षा देखील विशेषतः लहान मुलांसाठी मनात भय निर्माण करू शकतात.

## मूल्यमापन : काय? का? आणि कसे?

मूल्यमापनाची मुख्य उद्दिष्ट म्हणजे मुलांच्या अध्ययनाच्या गरजा समजून घेणे आणि त्यांच्यातील अध्ययनाचे सामर्थ्य वाढवण्याची परवानगी देणे तसेच काही अध्ययनात कमतरता असेल तर त्यावर मात करण्यास सहकार्य करणे. काय? का? आणि कसे करावे? हे समजून घेण्यासाठी खालील बाबी बघणे आवश्यक आहे.

- मूल्यमापनाचे निकष काय आहेत?
- मूल्यमापन कोणत्या उद्देशाने केले जाते?

या भागात या निकषांबाबत अनेक तपशीलवार माहिती दिलेली आहे. म्हणजेच अध्ययन निष्पत्ती. मूल्यमापन आणि त्यामागील मुख्य हेतू त्याच्या तपशीलासह ज्यामध्ये आपण वर्ग आणि शाळा आधारित मूल्यमापन धोरणाचा वापर करून मुलांचे अध्ययन आणि प्रगती कशी होते ते पाहू शकतो. यासंबंधी तपशीलवार चर्चा केलेली आहे.

## अध्ययन निष्पत्ती : मूल्यमापनाचे निकष

मूल्यमापनाचे निकषांमध्ये फक्त कोणत्या प्रकारचे अध्ययन आवश्यक आहे हे समजून घेणे आवश्यक नाही तर ज्या निकषांचे मूल्यमापन केले जाऊ शकते त्याचे निकष देखील आवश्यक आहेत. बरेचदा शाळा आधारित मूल्यमापन करणारे याबद्दल स्पष्ट नसतात कारण शिक्षक पाठ्यपुस्तके पूर्ण करण्याला अभ्यासक्रम पूर्ण करणे मानतात आणि त्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांचा वापर करून मुलांचे मूल्यमापन करतात. संपादणूक सर्वेक्षणामध्ये कोणत्याही स्पष्ट तर्काशिवाय बहुपर्यायी प्रश्न प्रकाराचा वापर करून मुलांचे मूल्यमापन केले जाते. प्रत्येक वर्गाकरिता विषय निहाय अध्ययन निष्पत्तीची जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापनाचे निकषाविषयीची माहिती केवळ विविध भागधारकांना देत नाही तर शाळा स्तरावरील शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि राज्य यंत्रणेतील अधिकारी यांनासुद्धा जबाबदार आणि त्यांच्या भूमिकेसाठी सतर्क व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सुनिश्चित असे प्रयत्न करण्यासाठी निर्देशित करतात; म्हणून स्पष्टपणे परिभाषित केलेली अध्ययन निष्पत्ती वेगवेगळ्या अभ्यासक्रमाच्या क्षेत्रातील अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी वेगवेगळ्या भागधारकांना त्यांच्या जबाबदारी आणि उत्तरदायित्व बाबत मार्गदर्शन आणि सुनिश्चित दिशा उपलब्ध करून देतात.

## मूल्यमापनाचा हेतू : अध्ययनासाठी मूल्यमापन

- मूल्यमापन हा अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील अविभाज्य भाग आहे आणि तो अध्ययनासोबत सातत्याने जोडलेला आहे. विविध अध्ययन प्रकारावर आधारित म्हणजे ज्ञान, कार्यक्षमता, कौशल्य, आवड, दृष्टिकोन आणि प्रेरणा इत्यादी मुलांच्या वर्गातील आणि वर्गाबाहेरील अशा दोन्ही अध्ययन कृतीमधील सहभाग याबाबतची माहिती गोळा करून त्यावर आधारित पुराव्यांची गरज आहे. त्याद्वारे पक्षपाती किंवा विकृतीपासून मुक्त असे समग्र मूल्यमापन घडेल.
- यामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या केवळ अध्ययनातील उणिवा समजण्यास मदत होणार नाही तर विद्यार्थ्यांची अध्ययन शैली आणि गरजा लक्षात घेऊन शिक्षकाला त्याच्या अध्ययन–अध्यापन प्रक्रियेबाबत प्रत्याभरण, पुनरावलोकन आणि सुधारणा करण्यास मदत होईल. यात विद्यार्थ्यांना अध्ययन–अध्यापन प्रक्रिया चे नियोजन, अंमलबजावणी, मूल्यमापन यामध्ये भागीदार म्हणून समाविष्ट केले जाते. अशा प्रकारे विद्यार्थी आणि शिक्षकांकडून परस्परास अभिप्राय देणे या दोन्ही प्रक्रिया घडतात. यामुळे

विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेच्या दरम्यान स्वतःच्या कामाचे समीक्षण करणे, प्रतिक्रिया देणे आणि त्याचे विश्लेषण करणे आणि त्यांच्यातील समस्या आणि उणिवा ओळखणे याकरिता संधी आणि जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यांना स्वतःचे मूल्यमापन करण्यास आणि सहाध्यायांच्या आणि गटांच्या कार्यावर विचार करून प्रतिक्रिया देण्यास प्रोत्साहन केले जाऊ शकते म्हणून केलेले मूल्यमापन हे मुलांचा आत्मविश्वास वाढवतात आणि आजीवन शिक्षणासाठी त्यांच्यात क्षमता विकसित करतात. हे अध्ययन–अध्यापन प्रक्रियांच्या दरम्यान सुद्धा घडते.

- अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आणि उद्दिष्टांवर आधारित निकष (प्रक्रिया, कौशल्य, अध्ययन दर्शके आणि अध्ययन निष्पत्ती) विरुद्ध विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा बेंचमार्क यांयाठी उपयोग केला जातो, विद्यार्थ्यांच्या वाढलेल्या अध्यनाबाबतची सर्वसमावेशक माहिती पुरविणे vis-a-vis अभ्यासक्रमातील सर्व क्षेत्रांवर आधारित उद्दिष्टे, वेगवेगळ्या विषयातील, कौशल्य, अभिरुची, दृष्टिकोन आणि प्रेरणा या सर्व बाबी समग्र पद्धतीने अभ्यासपूर्वक व अभ्यासेत्तर अशी विभागणी न करता अंतर्भूत केलेली आहेत.
- शिक्षक अध्ययनाच्या प्रक्रियेवर आधारित गोळा केलेले पुरावे जसे विद्यार्थ्यांची वैयक्तिक, गटाचे, स्वतःचे किंवा सहाध्ययींचे मूल्यमापनाद्वारे माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद घेतात. प्रत्येक मुलाची विद्यार्थी संचिका ठेवली जाऊ शकते ही मुलांच्या सद्यस्थितीत व त्यापूर्वीच्या प्रगतीबाबत तुलना करून संकलित पद्धती वापरली जाऊ शकते. शिक्षक प्रत्येक मुलाच्या अध्ययनाच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार नोंदवलेल्या निरीक्षणाचे रेकॉर्ड तिच्या/त्यांच्या डायरीत/लॉग बुक मध्ये/मुलांच्या नोटबुक वर अभिप्राय देऊन कृती पत्रिकेवरील किंवा प्रकल्पावर दिलेला अभिप्राय जतन करून ठेवू शकतो आणि जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा या नोंदीचा वापर करू शकतो, याचा वापर विद्यार्थ्यांच्या अध्ययन आणि प्रगती सुधारणा होण्यासाठी योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे.

वरील उतारा निष्ठा करीता शाळा आधारित मूल्यमापन NCERT घटक संच चार मधून घेतलेले आहे.

आपण अध्ययनासाठी चे मूल्यमापन, अध्ययन निष्पत्ती आणि अध्यापनशास्त्रीय आशय ज्ञानाची संकल्पना समजण्याकरिता वाचन केले पाहिजे. शाळेतील अध्ययन–अध्यापन प्रक्रिया ही विद्यार्थी केंद्रित अध्यापनशास्त्रावर तसेच कृतिशील अध्ययन तत्वावर आधारित असत नाही. जोपर्यंत अध्ययन निष्पत्ती साध्य केली जाऊ शकत नाही तोपर्यंत विविध विषयातील अध्यापनशास्त्राच्या घटक, आशयाची परिपूर्ण समज विकसित होत नाही. एक शाळा प्रमुख व नेतृत्वकर्ता म्हणून आपणास आपल्या अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेचे आकलन होणे आणि त्यासाठी स्वतःला तयार करणे आणि शिक्षकांना समजून घेऊन त्यांना अध्ययन–अध्यापन प्रक्रियेसाठी प्रशिक्षित करणे महत्त्वाची भूमिका आहे.

शाळा प्रमुख म्हणून आपल्याला इतरांच्या भूमिकेसंबंधी तेवढेच काम करणे गरजेचे आहे. जसे की 'स्व'चा विकास. इतरांच्या 'स्व' चा विकास, शिक्षकांचे व्यावसायिक कौशल्य विकसन, संघ बांधणी, सांस्कृतिक नवेपणा निर्माण करणे आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रियेच्या समग्र सुधारणेसाठी पालक आणि समाजासोबत सहभागिता विकसित करणे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाशिवाय केवळ वर्गांतर प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केल्याने अपेक्षित परिणाम प्राप्त होणार नाही. उदाहरणार्थ– एक प्रभावी शाळा वृंदांचा संघ (शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, शाळा प्रमुख आणि शाळा व्यवस्थापन समिती सदस्य) आहे की जो वैयक्तिक सामाजिक गुण आत्मसात करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित करून कार्य करतात. ज्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासावर फार मोठा परिणाम होऊ शकतो. समाजाद्वारे उपलब्ध संसाधनांचा अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट करण्यासारख्या योजना किंवा धोरणे शाळेतील मुलांसाठी अध्ययनाचे चांगले अनुभव प्रदान करू शकतात. त्याचप्रमाणे पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययनात लक्षणीय सुधारणा होऊ शकते. शाळेत नवकल्पना, नवविचार यांच्या संस्कृती प्रोत्साहित केल्याने शिक्षक आणि विद्यार्थी त्यांचा अध्ययनाच्या वाढीसाठी, प्रयोगशीलतेसाठी किंवा अभिव्यक्ती वाढीसाठी नवीन आणि सर्जनशील कल्पनांचा विचार करण्यास प्रवृत्त होऊ शकतात.

## शाळेतील शैक्षणिक पर्यवेक्षण :

शाळा प्रमुख म्हणून आपण सक्रिय अध्ययनाकडे लक्ष दिले आहे. आणि अध्ययन निश्चिती आणि अध्यापनाचे मूल्यमापन यासंदर्भात अध्यापनशास्त्रीय आशयज्ञान काय आहे यासंबंधी मूलभूत समज विकसित केलेली आहे. तरी शैक्षणिक नेतृत्व कर्ता म्हणून आपली भूमिका पुढीलप्रमाणे आहे :

- प्रथमतः आपल्या अध्यापन प्रक्रियेत ही नव्याने स्वीकारलेली तत्त्वे अंतर्भूत करा.
- विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर विकसित करण्यासाठी शिक्षक ह्या तत्वाचा अंगिकार वर्ग स्तरावर कसे करतात यासाठी त्यांना मार्गदर्शन करा. त्यांना प्रशिक्षित करा.

शैक्षणिक नेतृत्व करण्याची भूमिका ही अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या पर्यवेक्षणाची आहे. जी व्यक्तिशः आणि एकत्रितपणे शिक्षकांच्या कौशल्यवृद्धी करिता उत्तेजन, समन्वय आणि मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न म्हणून परिभाषित केली जाऊ शकते. शैक्षणिक पर्यवेक्षण म्हणून शाळा प्रमुख शिक्षकांकरिता त्यांचे ध्येय स्पष्टपणे ठरवू शकतो आणि ती साध्य करण्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करून देऊ शकतो.

एक शैक्षणिक पर्यवेक्षक म्हणून काम करणारा शालेय नेतृत्वकर्ता सुद्धा विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभव प्रदान करण्यास मदत व्हावी ज्यायोगे त्यांना विद्यार्थ्यांच्या विविध करिअरच्या मार्गामध्ये फायदा होईल अशा प्रकारे समाज आणि शिक्षक यांच्या सोबत समुदायाच्या गरजा लक्षात घेऊन काम करतात.

## पर्यवेक्षण नेमके कशासाठी हे समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे :

- शैक्षणिक मार्गदर्शन
- शिक्षक व सहकाऱ्यांशी शैक्षणिक बाबींवर संवाद
- शिक्षकांना प्रत्याभरण
- शिक्षकांना त्यांच्या चिंतनाविषयी पाठिंबा, सहकार्य
- प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मदत
- वर्ग व्यवस्थापन प्रत्यक्ष सहकार्य

## शाळा प्रमुख व शिक्षकांमध्ये पर्यवेक्षीय संबंध :

पर्यवेक्षीय संबंध हा एक व्यावसायिक शैक्षणिक संबंध आहे. जिथे शिकवणारा (शिक्षक), पर्यवेक्षण करणारा (शाळा प्रमुख) या दोघांचा परस्पर विश्वास आणि एकमेकांच्या आदराच्या आधारे हा संबंध विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. हे एक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे पर्यवेक्षण करावे असे नसून या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने स्वतःची अध्यापन प्रक्रिया या पद्धती सुधारण्यासाठी दोघेही शिक्षक व शाळाप्रमुख अध्ययनार्थी बनतात.

## शैक्षणिक पर्यवेक्षणाचे कार्य :

- **नियोजन आणि आयोजन :** पर्यवेक्षकाची महत्त्वाचे मूलभूत भूमिका ही शिक्षकांच्या बरोबर त्यांच्या दैनंदिन कामाच्या वेळापत्रकाची त्यांच्या सहकार्याने योजना आखणे आहे.
- **अनुकूल वातावरणाची तरतूद :** एक पर्यवेक्षक हा शाळेच्या भौतिक सोयी सुविधांची तरतूद करणे आणि त्या भौतिक संसाधनाची योग्य ठिकाणी व्यवस्था करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामध्ये बसण्यासाठी योग्य जागा, हवेशीर वर्गखोल्या, वर्गातील प्रकाशयोजना, पिण्याच्या व वापराच्या पाण्याची सोय इत्यादीचा समावेश आहे. या व्यतिरिक्त शिक्षका समवेत पर्यवेक्षक हा शैक्षणिक अध्यापनात उपयोगी शैक्षणिक साहित्याच्या तरतुदीबाबत मदत करतो.
- **नेतृत्व आणि मार्गदर्शन :** पर्यवेक्षक हा शिक्षकांचे नेतृत्व करतो. तो/ती शिक्षकांचे नेतृत्व करून त्यांनी उत्कृष्ट काम करावे यासाठी आपला प्रभाव निर्माण करतो. ती/तो शिक्षकांना साध्य करता येण्याजोगे ध्येय आणि लक्ष निश्चित करून ही साध्य

करण्यासाठी एक सुलभक म्हणून सूचना व मार्गदर्शन करते.

- **प्रेरणा :** पर्यवेक्षक शिक्षकांना प्रेरित करतो.
- **नवीन शैक्षणिक पद्धतीची ओळख :** पर्यवेक्षक बदलत्या वेळेनुसार अध्ययन अध्यापन प्रक्रियेत नवनवीन होणाऱ्या ज्ञानातील आणि कौशल्यातील बदलालाबाबत अध्यावत राहणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी शिक्षकासह निरंतर चर्चा करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षकांचे मनोबल वाढते, कामाची गती वाढते, सुयोग्य परिणाम साधला जातो आणि मानवी संबंध सुधारतात आणि याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुधारणा घडून येते.
- **पडताळणी :** पडताळणी प्रक्रियेबाबतची प्रगती ही पर्यवेक्षकांनी केलेले एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. यामध्ये प्रत्यक्ष शिक्षकांच्या सहकार्याने निर्धारित केलेल्या ध्येया बाबत शिक्षकांची प्रत्यक्ष कामगिरीची पडताळणी तसेच मुलांच्या अध्ययन स्तराची पडताळणी समाविष्ट आहे.

## पर्यवेक्षण कसे करावे? याकरिता शैक्षणिक पर्यवेक्षणाची तंत्रे :

Check video link in audio-visual resources on Observation, Feedback and Supervision

संदर्भसूचीमध्ये दिलेले दृकश्राव्य व्हिडीओ लिंक द्वारे निरीक्षण, प्रत्याभरण आणि पर्यवेक्षण याबाबत सखोल आकलन होण्यासाठी व्हिडिओ अभ्यासावा.

खाली दोन प्रकारचे तंत्र दिलेली आहेत. जी शाळा प्रमुखांना शैक्षणिक पर्यवेक्षण प्रभावीपणे पार पाडण्यास मदत करू शकतील.

**Ask-Describe-Ask : (विचारा-वर्तन करा-विचारा) :** अधिक चांगल्या अध्यापनाच्या अभिप्रायासाठी एक प्रभावी तंत्र म्हणून Ask-Describe-Ask या तंत्राचा वापर होतो. यात पर्यवेक्षकास लोकशाही भूमिकेतून काम करण्याची संधी मिळते. ज्यामध्ये पर्यवेक्षक (शाळा प्रमुख) आणि निरीक्षक (शिक्षक) हे दोघेही सहअध्यायी असतात. या प्रक्रियेत भविष्यातील उद्दिष्टांवर आणि नियोजनांच्या अंमलबजावणी संदर्भात दोघांमध्ये समान करार केला असतो. हा दृष्टिकोन भीतीमुक्त आणि पर्यवेक्षकांचा विश्वास विकसित करण्याच्या दिशेने जातो. ज्यामुळे संदर्भाने चर्चा सुलभ होते. आपण या प्रक्रियेबाबत अधिक माहिती या वेबसाईटवर पीडीएफमध्ये उपलब्ध आहे. साधनांच्या स्वरूपात केस स्टडीच्या स्वरूपात आणि वाचन संदर्भसाहित्य म्हणून यादी सुद्धा जोडलेली आहे.

या घटकसंचाचे संक्षिप्त मुद्दे खाली दिलेले आहेत. हे मॉडेल मुख्याध्यापक/पर्यवेक्षक आणि शिक्षक यांच्यातील शैक्षणिक पर्यवेक्षकांबाबत शिक्षकांच्या वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे निरीक्षण करून शिक्षक व पर्यवेक्षक यांच्यातील संवाद आहे.

1. शिक्षकाला प्रथम त्याच्या वर्गातील स्वतःच्या अध्यापनाचे मूल्यमापन करावयास सांगा.
   - त्याच्या किंवा तिच्या अध्यापनाचे ध्येय काय होते?
   - अध्यापन प्रक्रियेत काय चांगले घडले? आणि अधिक चांगले काय घडू शकले असते?

आपण हे असे करतो आहे कारण संवाद सुरू करताना शिक्षकांनी हे ऐकले आहे याची खात्री करू, यामुळे पर्यवेक्षकांवर शिक्षकांचा विश्वास वाढतो. संवाद हे तिच्या/त्याच्या स्वतःच्या शिकण्यासाठी आणि प्रगतीसाठी आवश्यक आहे.

2. वर्गाच्या निरीक्षणा दरम्यान आपण पर्यवेक्षक म्हणून काय पाहिले याचे वर्णन करा.
   - वर्गात आपण काय निरीक्षण केले याबाबत शिक्षकांना वर्णनात्मक माहिती द्या.
   - शिक्षकांचा स्वयंमूल्यमापनावर अभिप्राय द्या.
   - आपण जे बघितले आहे ते मी निरीक्षण केले – त्यासारखे वाक्य वापरा किंवा आपण काय पाहिले आहे यासंबंधी याखालील नोंदी आहेत.

- न्यायाधीशाच्या भूमिकेत जाऊ नका.
- यामुळे शिक्षकांवर त्यांच्या स्वतःच्या अध्यापनावर विश्वास वाढविण्यास आणि मिळालेल्या अभिप्रायातून प्रगती करण्यास मदत होईल.

3. शिक्षकांकडून सुधारणेबाबत त्यांची समज आणि योजना याबाबत विचारा.
   - आपले अध्यापन कसे आहे व पुढच्या वेळी आपण वर्ग अध्यापनात अधिक वेगळे काय करू शकाल?
   - तुमचा स्वतःचा अभिप्राय नोंदवा. पण हे ध्यानात ठेवा तुमची भूमिका ही शैक्षणिक पर्यवेक्षकाची असून,शिक्षकांना शिकण्यात मदत करण्यासाठी आहे आणि जरी तुम्ही प्रत्यक्ष हजर नसला तरीसुद्धा शिक्षक ठरवलेले बदल स्वीकारून काम करीत राहील.
   - पुढील करावयाच्या कृती ठरवा आणि एकत्रितपणे सुधारणांशी एकनिष्ठ रहा.

### अध्ययनाचे टप्पे /अध्ययन प्रक्रिया :

अध्ययन टप्प्यामध्ये वर्ग निरीक्षकाच्या शृंखलामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक अध्यापन प्रक्रिया निरीक्षणात एकत्रितपणे सहभागी असतात. याचा उद्देश असा आहे की शाळा किंवा शाळांमध्ये अध्ययन अध्यापनात प्रभावी प्रणालीचा विकास करणे. अध्ययन–अध्यापनातील केंद्रित क्षेत्राभोवती नेहमी निरीक्षण केले जाते हे निरीक्षणे कसे केले जाते. अशा बाबींचेच निरीक्षण अधिक केले जाते. सामान्यतः समस्याग्रस्त आणि शाळेला या संदर्भातील समस्यांना दर्शविणे कठीण जाते.

- विशिष्ट विषयातील मुलांच्या गतीत फरक.
- काही मुलांचा अध्ययनासंबंधीची गरज प्रभावीपणे पूर्ण होत नाही हे चिंताजनक आहे.
- शिक्षकांकडून उच्च आणि निम्न स्तरावरील प्रश्नांचा वापर

सर्व लक्ष केंद्रित केलेले क्षेत्र वर्ग निरीक्षणाद्वारे ओळखले जाणे आवश्यक आहे. निरीक्षकांची टीम (शिक्षक आणि शाळा प्रमुख) निवडलेल्या थीमच्या आसपास सुमारे तीस मिनिटे घालवू शकतात.

दुपारच्या वेळी निष्कर्षांच्या संदर्भात चर्चा केली जाते. निरीक्षक निवडलेल्या थीम संदर्भात त्यांनी काय पाहिले यातून सहभागीत्वाची समज विकसित करण्याकरिता वर्णनात्मक भाषेचा वापर करतात. त्यानंतर पुढचा टप्पा त्यांच्या स्वतःच्या आणि शाळेच्या अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुधारण्यासाठी याचा उपयोग करता येऊ शकतो. शाळेतील स्टाफ, शाळेबाहेरील निरीक्षक खालील प्रमाणे शिकण्याच्या प्रक्रियेचा वापर करू शकतात.

- शाळेतील शिक्षकांचा एक समूह स्वतःच्या व्यवसायिक शिक्षणासाठी शिकण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी संपूर्ण शाळेत सुधारणा घडवून आणण्याकरिता शिक्षकांचा समूह व शाळा प्रमुख एकत्रितपणे कार्य करतात.
- शालेय सुधारणा प्रक्रियेत बाह्य यंत्रणेची पुन्हा पुन्हा शिकण्याच्या प्रक्रियेचा वापर करून मदत घेणे. जसे की शालेय व्यवस्थेतील पर्यवेक्षीय यंत्रणा/डायट/विद्या प्राधिकरण अधिकारी
- एखाद्या विशिष्ट शाळेत विविध शाळेतील मुख्याध्यापकांचा/शाळा प्रमुखांचा एखादा गट पुन्हा पुन्हा शिकण्याच्या प्रक्रियेत गुंतलेला असणे.

पुन्हा पुन्हा शिकण्याच्या प्रक्रियेचा मुख्य गाभा हा की, प्रत्येक जण संयुक्तपणे, चौकसपणे विचार करून शिकत आहे. हे गट एखाद्या विशिष्ट समस्येचे निराकरण करेल अशी अपेक्षा नाही परंतु निरीक्षण कर्त्याला समस्येच्या संबंधी विषयावर लक्ष देण्याच्या दृष्टीने पुढे कोणती पावले उचलावीत याबद्दल स्पष्ट चित्र आणि नवीन कल्पना देतील.

## शाळेत सतत शिकण्याच्या संस्कृतीत वाढ करणे :

शाळेतील शिकण्याची संस्कृती अशा पद्धतीने परिभाषित केले जाऊ शकते की असे वातावरण जे मुक्त मानसिकतेचे समर्थन करते, ज्ञानासाठी स्वतंत्रपणे शोध घेण्यास आणि शाळेच्या ध्येय आणि मिशनकडे सामायिक शिक्षणाद्वारे निदर्शित करते. सतत शिकण्याच्या चैतन्याने भारलेले वातावरण विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा प्रमुखांच्या सतत शिकण्याची ऊर्जा निर्माण करून प्रोत्साहित करते. तथापि शिक्षण संस्कृती तयार करण्यासाठी पहिले पाऊलशाळा प्रमुखानी घेतले पाहिजे. सुधारणेसाठी, अभिप्रायासाठी सहभागी होण्याकडे आपला दृष्टिकोन एक आदर्श म्हणून काम करू शकतो. जे इतरांच्या वागणुकीच्या बदलास व शिकण्याच्या वातावरण निर्मितीस प्रेरक ठरू शकतो. ही संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे. जिथे संघ एकमेकांकडून शिकत असतो तसेच शाळेच्या पलीकडे असलेल्या स्रोतांकडूनही शिकतो.

आपण पुढील गोष्टी करू शकता :

- शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला संधी द्या.
- जे नवीन बाबी शिकण्यात गुंतलेले असतात त्यांच्या कृतीला मान्यता द्या, ओळख द्या.
- वरील बाबी द्या आणि त्यांचा अभिप्राय मिळवा.
- बदल आणि नावीन्यास प्रोत्साहित करा.
- औपचारिक पद्धती ज्ञान आणि माहितीचे वितरण करण्याची प्रक्रिया विकसित करा.

या भागात आपल्या शाळेत शिकण्याची संस्कृती विकसित करण्यासाठी दोन प्रभावी घटक म्हणून चिंतनाच्या प्रक्रियेविषयी अधिक जाणून घेऊ शकाल.

Check Video Link in Audio-visual Resources on Teachers as Reflective Practitioners.

## चिंतनशील व्यावसायिक म्हणून शिक्षक आणि शाळाप्रमुख :

चिंतन म्हणजे आपण अशाप्रकारे समजून घेऊ शकतो की जिथे शिक्षक आणि शाळा प्रमुख त्यांच्या व्यवसायाचा अर्थ समजण्यासाठी आणि व्यावसायिक कौशल्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी स्व परीक्षणाद्वारे आणि स्व मूल्यमापनाच्या प्रक्रियमध्ये सातत्याने मग्न असतात. चिंतन हे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. ज्याद्वारे आपण स्वतःच्या व्यावसायिक कामाचे चिकित्सकपणे परीक्षण करू शकतो. व्यक्ती जो त्यांच्या व्यावसायिक कामकाजात सातत्याने चिंतनशील राहून सराव करतो त्याला चिंतनशील व्यवसायिक असे म्हणतात. वर्ग प्रक्रियेदरम्यान किंवा वर्ग प्रक्रियेनंतर त्याच्या/तिच्या अध्यापनाच्या परीक्षणाच्या हेतूने एखादा शिक्षक चिंतन या साधनाचा वापर करू शकतो. अशा परिस्थितीत शिक्षकाला पुढील बाबींवर चिंतन करण्याची गरज असते. विषय कसा विद्यार्थ्यांपर्यंत नेणार याविषयी शिक्षकांचे काय गृहीत होते? पाठाचे नियोजन कसे केले होते? विद्यार्थ्यांच्या गरज अनुरूप विविध अध्ययन प्रक्रियेनुसार अध्यायांच्या संधी व त्यानुसार अध्यापन योजना आखली होती की केवळ व्याख्यान पद्धतीवर भर होता. गृहीतकांवर पक्षपाती आधारित असलेला वर्ग होता, वर्ग अध्यापन दरम्यान शिक्षक काय विचार करीत होते? सर्व विद्यार्थी अध्ययनात प्रवृत्त होते किंवा कसे इत्यादी. निरंतर चिंतनामध्ये गुंतलेल्या व्यक्तीला स्वतुःचे अध्यापन किंवा नेतृत्व कौशल्य विकसित करण्यास मदत मिळते कारण स्वतःचे परीक्षण करण्याच्या प्रक्रियेमुळे जुन्या समस्या, आव्हाने किंवा काम करण्याचा पारंपारिक मार्ग वृत्ती यांचा शोध घेऊन किंवा नवीन अंतर्दृष्टी आणि सर्जनशील समाधानासाठी नवीन दरवाजे उघडले जातात. एखाद्याच्या विश्वास प्रणाली आणि मानसिक दृष्टिकोनाची चिकित्सकपणे परीक्षण करण्यासाठी चिंतन हे एक महत्त्वपूर्ण साधन असू शकते. खाली एक संदर्भासाठी तक्ता दिलेला आहे त्यात वर्णन केल्याप्रमाणे आपल्या शाळेत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया डावीकडून उजवीकडे अशी पुढे जाणे आवश्यक आहे हे समजण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. हा एक आलेख आहे जो आपल्या स्वतःच्या कामासंबंधी चिंतनाच्या प्रक्रियेचा आरंभ करण्यास मदत करू शकते.

| वर्गात अंमलबजावणी करावयाचे सिद्धांत | | अनुभव, निरीक्षणे आणि सिद्धांतिक गुंतवणूक यावर आधारित विकसित झालेले संकल्पनात्मक ज्ञान |
|---|---|---|
| 1. शिकण्यास बाह्य म्हणून समजले जाणारे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान करणे अपेक्षित आहे. | ← → | 1. वैयक्तिक आणि सामाजिक अनुभव विश्वातून सामाजिक संदर्भानुसार अध्यापन अध्ययन याद्वारे चिकित्सक विचारातून निर्माण झालेले ज्ञान. |
| 2. अध्ययन आर्थिक व्यक्ती स्वतंत्रपणे स्वाध्याय, गृहपाठ, क्षेत्रभेट आणि अध्यापनाचा सराव इत्यादीवर काम करतात. | ← → | 2. काम करण्यासाठी टीममध्ये प्रोत्साहित केले जाते. वर्ग आणि अध्ययनार्थींचे निरीक्षणे, आंतरक्रिया आणि विविध विषयावरील प्रकल्प इत्यादीचे सादरीकरण गटात करण्यास प्रोत्साहित केले जाते. |
| 3. शिकण्याच्या सामाजिक वास्तविकतेवर आणि अध्ययनाच्या प्रक्रियेवर विचार करण्यास वाव नाही. | ← → | 3. अध्ययनार्थ्यास स्वतःच्या समाजातील स्थिती आणि त्यांची स्वतःच्या वर्गातील चर्चा व संवादातील एक घटक म्हणून असलेले समज पडताळणीस दिल्या जाते. |
| 4. विषय ज्ञानाच्या अध्ययनार्थीच्या संकल्पना पडताळणीस वाव नाही. | ← → | 4. पुनर्रचना करण्यासाठी, परीक्षणासाठी आणि ज्ञानाविषयीचे चुकीच्या धारणेला आव्हान करण्यास नियोजित असा वाव दिला जातो. |

### विद्यार्थ्यांच्या अध्ययन निश्चिती सुधारणा करण्यासाठी टीम लर्निंग/संघ अध्ययन:

शाळेसंबंधी विविध मुद्द्यांवर एकत्रितपणे संघ म्हणून काम करणारा आधीपासूनच अस्तित्वात असलेला कर्मचारीवर्ग संघाचे उदाहरण म्हणून बघितले जाऊ शकते. शाळा कर्मचाऱ्यांची बैठक ही शाळा प्रक्रियेतील नियमित बाब असते. साधारणतः महिन्यातून एकदा किंवा दोनदा आयोजित होते. शाळा प्रमुख म्हणून आपण कर्मचारी बैठकीद्वारे शैक्षणिक सुधारणा/ बदलाच्या प्रक्रियेचे नेतृत्व करू शकतात. हे महत्त्वाचे आहे की आपण अजेंडा असलेला आणि शिक्षणाविषयी केंद्रीभूत बैठका घेणे व शाळा सुधारण्यासाठी आवश्यक मुद्द्यांवर तसेच असलेल्या उणिवांवर चर्चा करण्यासाठी सर्वांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे शिकले पाहिजे. आपण खालील प्रमाणे काही मुद्द्यांवर चर्चा घडवून आणू शकतो 1) जसे की शिक्षकांनी त्यांच्या वर्गात अंतर्भूत केलेली नवीन/नाविन्यपूर्ण अध्ययन–अध्यापन संबंधित कृती 2) विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन याबाबत केलेल्या योजना, राबवलेल्या प्रक्रिया (अध्यापनातील मूल्यमापन आणि अध्ययनासाठी मूल्यमापन) 3) विद्यार्थी अध्ययन निष्पत्ती. स्टाफ मिटींग ही सर्व शिक्षकांसाठी शिकण्याचे एक व्यासपीठ असते. जेथे अध्यापनाबाबत, विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, प्रत्येक विद्यार्थ्यांची वेगवेगळे अध्ययन गरजांवर चर्चा तसेच नवीन अध्यापन कृती, उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या अध्ययन वृद्धीवर केंद्रित असलेल्या अशा सर्व बाबींवर चर्चा करू शकतात. कर्मचारीवृंदामध्ये चिंतनात्मक संवाद घडवून आणण्यासाठी या बैठकींचा सुद्धा चांगला वापर होऊ शकतो.

**प्रभावी स्टाफ बैठक आयोजनाचे मार्गदर्शक मुद्दे**

- बैठकीचा हेतू स्पष्ट करा.
- चर्चेत सभेचा अजेंडा ठेवा.
- बैठकीची वेळ कालावधी निश्चित करा व त्या प्रमाणे अजून यातील प्रत्येक मुद्द्यानुसार वेळ ठरवा.
- बैठकीचे नेतृत्व करा आणि बैठक दिलेल्या मुद्द्याप्रमाणे आयोजित होईल हे पहा सर्व सदस्यांनी मांडलेले मुद्दे मत आणि पुरावे एकत्र करा व त्या आधारे निर्णय घ्या.
- या बैठकीच्या दरम्यान कामासंबंधी जबाबदारी निश्चित करा आणि कामाचे लक्ष आणि उत्तरदायित्व ठरवा.
- बैठकीत सर्व सदस्यांचा सहभाग असल्याची खात्री करून घ्या.
- ठरवलेल्या अजेंडाचा नियमित पाठपुरावा करा आणि बैठकीतील क्रियांचा आढावा घ्या.

## शाळा विकास आराखडा :

शाळाविकास आराखड्यात एक विशिष्ट कालावधीकरिता शाळेद्वारे ठरवलेल्या अपेक्षित परिणामांची पूर्तता करण्यासाठी एक दृष्टी, ध्येये, लक्ष्य आणि कार्यात्मक पद्धती (रणनीती) असते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच समाज, पालक आणि इतर भागधारकांसह उद्दिष्ट ठरविणारे आणि हे कसे आणि केव्हा साध्य करता येईल, यासंबंधी तपशिलाची आखणी करणारे नेतृत्व म्हणून शाळा प्रमुखांवर हा एक शाळा स्तरावरील कार्यभार आहे. मूलभूत कल्पना म्हणजे शाळेला त्याच्या विकासासाठी दिशा प्रदान करणे होय.

हे लक्षात घ्यावे लागेल की शाळा विकास आराखड्याचे उद्दिष्ट मोजण्यायोग्य आहेत का? जेणेकरून जेव्हा शाळा विकास आराखड्याची ध्येय आणि उद्दिष्टे अंमलात आणली जातात आणि पूर्ण केल्या जातात तेव्हा शाळा या स्थितीत आहे का की जिथे ती ठामपणे म्हणू शकेल की त्यांनी ठरविलेले ध्येय आणि उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण केलेली आहेत व ती सर्व मोजता येण्यासारखी आहेत.

## एक स्पॉट लाईटसारखी दृष्टी (Vision on a Spot Light) :

भविष्यवेधी दृष्टी ही शाळा विकासासाठी दिशा प्रदान करणारी पहिली पायरी आहे. Vision हा एक विस्तृत कॅन्व्हास आहे. ज्यातून विकास योजना सुरू होते. शाळा विकास आराखडा हा शाळास्तरावर असलेले कार्यान्वयन ज्यात अंमलबजावणीसाठी चे नियोजन आणि मार्गदर्शन केलेले आहे. दृष्टी विकसित करताना आपण खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहेत.

- दृष्टी विधानातून भविष्यवादी सिद्धांत प्रतिबिंबित झाला पाहिजे.
- दृष्टी विधान हे मूल्याधारित असले पाहिजे उदाहरणार्थ सर्व शिकू शकतात यावर विश्वास असणारा विद्यार्थी घडवणे
- एक निर्धारित कालावधीत साध्य करता येईल अशा प्रकारे दिशा दर्शवणारे विधान यात असावे.
- दृष्टी विधानात निश्चित कालावधी निर्दिष्ट केलेला असेल. सामान्यत: तीन किंवा पाच वर्ष
- शाळा विकास आराखड्यात एक रोड मॅप असेल ज्यात संस्थेला आवश्यकतेनुसार बदल करणे आणि हे बदल जेव्हा केले जातील याची नोंद असेल.

## शाळा विकास आराखडा तयार करण्याचे तीन टप्पे

शाळा विकास आराखडा तयार करताना तीन भागात विभागणी करता येते.

1) नियोजनाचा टप्पा
2) अंमलबजावणीचा टप्पा
3) संनियंत्रण आणि मूल्यमापनाचा टप्पा

### पायरी – 1 – समित्या/संघाची स्थापना

शाळा विकास आराखड्याच्या निर्मितीसाठी आणि अंमलबजावणीसाठी संघ तयार करून जबाबदारी सोपवतात ही कृती/पाऊल शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना संघामध्ये काम करण्यास सक्षम बनवतात. तसेच त्यांच्या क्षमता आणि कौशल्यांचा वापर करतात त्यामुळे शाळेशी आपलेपणाची भावना वाढीस लागते. ही कृती त्यांना शाळा आणि शाळेच्या विकासाजवळ आणते. प्रत्येक शाळेसाठी कमीत कमी चार संघाची  रचना करणे ही एक व्यावहारिक आणि कामाच्या दृष्टीने योग्य बाब आहे.

खालीलप्रमाणे संघ असू शकतात

1) नियोजन करणारा संघ
2) कृती करणारा संघ
3) नेतृत्व करणारे
4) मूल्यांकन करणारा संघ

### पायरी – 2 : आधारभूत माहिती

नियोजन प्रक्रियेमध्ये शाळा, शाळेची सांख्यिकीय माहिती, नोंदणी, भविष्यातील नोंदणीची आवश्यकता, शिक्षक आणि त्यांची गरज, समुदायाबाबत समज, शाळा सुविधा, कर्मचारी वृंद. समाज भागधारक जे शाळा नियोजन प्रक्रियेत सहभागी असतील, शालेय कर्मचाऱ्यांना शाळा विकास आराखड्याच्या या प्रक्रियेतून त्यांच्याकडे काय आहे त्यांना काय हवे आहे आणि या प्रक्रियेतून ते कसे मिळवायचे याचे आत्मनिरीक्षण, परीक्षण करणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा त्यांच्या विशिष्ट आवश्यकतांच्या आधारे सुधारण्यासाठी/प्रगतीसाठी स्वतःचा रोड मॅप स्वतः तयार करीत असतात.

### पायरी – 3 : दृष्टी विकसन/भविष्यवेधी दृष्टी

शाळा आधारित विकास आराखडा तयार करताना दिशा निर्देश प्राप्त व्हावेत म्हणून भविष्यवादी दृष्टी व पायाभूत सांख्यिकीय माहितीचा खूप उपयोग होऊ शकतो. दृष्टी तयार करण्यासाठी आपल्याला आपल्या वर्तमान भूमिकेबद्दल आणि आपल्या भूमिकेविषयी आपल्या अपेक्षांचे पुनर्विलोकन करावे लागेल. आपणास स्व दृष्टी आणि संस्थात्मक दृष्टी यावर भाष्य करावे लागेल. उदाहरणार्थ आपणास पुढील तीन वर्षानंतर स्वतःला कुठे पाहण्याची इच्छा आहे. पुढील तीन वर्षानंतर आपणास आणि आपली संस्था कशी असावी असे वाटते (संस्थात्मक दृष्टी) इत्यादी पुढे सर्व भागधारकांच्या मदतीने दृष्टी विधान तयार करा. ही एक सामूहिक कृती आहे दृष्टी विधान तयार करण्याच्या प्रक्रियेचे अनुसरण करा.

- आपली दृष्टी दृश्यमान ठेवा.
- एक वाक्य किंवा संक्षिप्त परिचय ठेवा.
- सर्व विधान वर्तमान काळात लिहा जणू काही आपण आधीच पूर्ण केलेले असेल.
- हे दृष्टी मनाची योग्य व्यवस्था आणि भविष्याबद्दलच्या आत्मविश्वास निर्माण करते.

### पायरी – 4 : प्राधान्यक्रम ठरवा

मनामध्ये दृष्टी विधान ठेवून शाळेसाठी प्रमुख प्राधान्याने करावयाच्या बाबी निवडा. शाळेच्या संदर्भाने विशिष्ट गरजांवर आधारित दृष्टी विधान विकसित केले असावे. या विविध प्राधान्याने करावयाच्या बाबी अशा तऱ्हेने आखा की जी आपणास पुढील तीन वर्षात नेमके काय करायचे आहे याचे स्पष्ट संकेत देईल जेणेकरून ठरवलेले व्हिजन 3 वर्षात साध्य होईल. एक महिन्यासाठी कोणती कृती निर्धारित केल्यात आणि कोणावर त्याची जबाबदारी सोपवली आहे याचे वर्णन करा. उदाहरणार्थ – सर्व मुलांच्या शैक्षणिक गरजा ओळखा व मूल्यांकन करा.

- शिक्षकाचे विषयज्ञान व अध्यापनाचे कौशल्य विकसित करा.
- सर्व विद्यार्थी शिक्षकांसाठी अध्ययन अनुभव आणि अध्ययन- अध्यापनाची प्रक्रिया आनंददायी बनवा.

### पायरी - 5 : ध्येय/उद्दिष्ट

आपल्या सहकाऱ्यांसह आपल्या शाळेबद्दलचे व्हिजन (Vision) विकसित केल्यावर ध्येय निश्चित करता येते. जर आपले दृष्टी विधान तीन वर्षासाठी केले गेले असेल, तर त्या दृष्टी विधानाशी निगडित तीन वार्षिक ध्येये ठेवणे उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा की प्रत्येक वर्षी आपल्याला उद्दिष्टांच्या माध्यमातून ध्येय निश्चित ध्येय साध्य करावे लागेल. हि ध्येये आपण निश्चित केलेल्या प्राधान्यांना संलग्नित असतील. उद्दिष्ट ही कमी कालावधीसाठीची आणि मापनीय असतात. ती तीन, सहा किंवा नऊ महिन्यांच्या कालावधीची हवीत. एका वर्षात वार्षिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपण दोन-तीन उद्दिष्ट ठरवू शकतो. उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यास नियोजनबद्ध कृती आराखडा मदत करतो.


### पायरी - 6 : यंत्रणेचे संनियंत्रण आणि मूल्यमापन

एकदा शाळा विकास आराखडा (SDP) तयार झाला की, त्याचे कार्यान्वयन आणि वेळोवेळी संनियंत्रण करणे गरजेचे असते. निश्चित केलेल्या उद्दिष्टांवर लक्ष ठेवण्याचे कामात लक्ष ठेवण्याचे कामात संनियंत्रण समिती मदत करू शकते. तुम्ही SDP च्या प्रगतीचे मूल्यमापन सहामाही किंवा वार्षिक करू शकता.

- शाळा विकास आराखड्याच्या निर्मिती आणि कार्यान्वयन यामध्ये नेता म्हणून तुमच्या भूमिकेकडे तुम्ही कसे पाहता?
- आज तुमच्या शाळेची बलस्थान आणि उणिवा संदर्भात तुमची शाळा आज कुठे आहे? चिंतन करा. तुमच्या शाळेच्या प्राधान्यक्रमाने तुम्ही कोणत्या दोन बाबीत सुधारणा करू इच्छिता? का?
- शाळा विकास आराखडा तयार करताना किती टप्पे आहेत?

प्रत्येक शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्यात बलस्थाने आणि क्षमता वेगवेगळ्या असतात. ते या क्षमतांचा वापर वर्गव्यवस्था, सर्वसाधारण समस्या आणि दररोज येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी करतात. तथापि वर्गाचा आकार, संशोधनाचे स्वरूप, शिक्षकांना शिकवलेले, क्षेत्रातील संसाधनांची उपलब्धता, भाषा आणि भौगोलिक विविधता इत्यादी समुदाय आणि शैक्षणिक प्रशासकांना शिकवण्याआधी आव्हान देण्यास प्रवृत्त करतात. प्रत्येक शिक्षक व मुख्याध्यापकांना शैक्षणिक नेतृत्व प्रदान करणे, नावीन्यपूर्ण अनुभव, दैनंदिन समस्या निराकरण करणे आणि शेवटी शाळेच्या उन्नतीसाठी योगदान देणे हे सुनिश्चित करणे आणि सक्षम करणे ही काळाची गरज आहे. वरील पार्श्वभूमीवर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) अध्ययन अध्यापनाचे वातावरण वृद्धिंगत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

युनेस्कोनुसार डिजिटल माहिती तयार करणे, संग्रहित करणे, पुनर्प्राप्त करणे, हाताळणे, पाठविणे आणि प्राप्त करणे यासाठी ICT तंत्रज्ञानाची साधने व संसाधने यांच्या विविध संचांचा संदर्भ देते. ICT च्या क्षमतांचा वापर करण्यासाठीचा किती आणि कसा वापर करावा हे आपण समजून घेतली पाहिजे. MHRD-GOI च्या मदतीने शालेय शिक्षण क्षेत्रात अलीकडच्या काळात घेण्यात आलेल्या ICT च्या महत्त्वाच्या उपक्रमांची येथे चर्चा केली आहे.



- National Repository of Open Educational Resources (NROER), ePathshala (Web Portal and Mobile Apps), *DIKSHA* यासारख्या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांद्वारे मुक्त शिक्षणाचे संसाधने image, audios , videos, inter actives graphics, animations, digital books , digital maps, timelines etc. या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात पुढाकार घेतला आहे. निरंतर अध्ययन आणि सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी, MOOCs on *SWAYAM* आणि ICT अभ्यासक्रमातून या कोर्सची शृंखला ऑनलाईन तसेच मिश्रित पद्धतीत उपलब्ध करून दिली आहे.– 24 × 7 DTH TV चॅनेल अंतर्गत *स्वयंप्रभा* जनतेपर्यंत पोहोचवण्याचा एक उपक्रम आहे, जिथे इंटरनेट कनेक्टिव्हिटी एक आव्हान आहे.
- *शाळा गुणवत्ता (शगुन)* शिक्षकांना त्यांच्या यशोगाथा, यशस्वी उपक्रम इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी वाव देते, ज्या ऑनलाईन सनियंत्रण करण्यासाठी सक्षम बनवते.
- वाढत्या तंत्रज्ञानाच्या वापरासोबतच सायबर जगातील संभाव्य धोके सुद्धा वाढले आहेत. सायबर सुरक्षिततेचे निकष, वापर करताना घ्यावयाची काळजी, सायबर कायदे इत्यादी गोष्टींबद्दल जागृकता निर्माण करणे त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करणे ही जबाबदारी धोरणकर्ते, अभ्यासक्रम विकसन करणारे आणि शिक्षकांची आहे.
- अध्ययनाच्या व्यवस्थापन पद्धतीद्वारा (Learning Management System) साधारणपणे 41 लक्ष शिक्षकांचे विविध टप्प्यात प्रशिक्षण पूर्ण करण्याचा पुढाकार नुकताच घेतलेला आहे. जो www.itpd.ncert.gov.in या वेबसाईट द्वारा संचलित केला जाणार आहे. हे पोर्टल एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांची प्रगती आणि अंमलबजावणी प्रभावीपणे करेल. आयसीटी अनेक साधन गट आणि प्रशिक्षित केलेल्या शिक्षकांचा माहितीचा अभ्यास व विश्लेषण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. ICT मधून राज्य व केंद्रशासित प्रदेशाद्वारे सर्वोत्कृष्ट यशोगाथा करण्यास विविध डॅशबोर्डवर स्थान उपलब्ध करून दिले आहे.

## यशोगाथा :

### शाळा प्रमुखाचे नाव – छेवांग युरीगोल, शासकीय प्राथमिक शाळा, खार, लाहौल, स्पिति हिमाचल प्रदेश

शासकीय प्राथमिक शाळा, खार (लाहौल, स्पिती हिमाचल प्रदेश) या दुर्गम भागात वसलेली आहे. या शासकीय प्राथमिक शाळेने भरीव कामगिरी केलेली आहे. ही शाळा मागास भागात आहे आणि मुख्य भागापासून लांब आहे. प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीदेखील शाळाप्रमुख छेवांग यांना त्यांच्या शाळा स्थापन करण्याच्या स्वप्नांपासून परावृत्त करू शकली नाही,जी शहरी वस्तीतील शाळांपेक्षा बिलकुल कमी नाही. शाळा सुसज्ज आणि सुस्थितीत आहे. दोन शिक्षक असलेली ही एक शाळा आहे. शाळेमध्ये सुसज्ज उपयुक्त असे ग्रंथालय, अध्ययन–अध्यापन सामग्री कोपरा, ॲक्टिविटी रूम स्वयंपाकघर, खेळाचे मैदान आहे. हवेशीर वर्ग आणि नियमित वीज पुरवठा उपलब्ध आहे. पर्यावरण अनुकूल अशा सौर दिव्यांचा वापर वापर येथे केला जातो हे उल्लेखनीय आहे. अशा तंत्रज्ञानाचा वापर करून तरुणांना पर्यावरण समजण्यास प्रोत्साहित करणे आणि त्यायोगे अधिक शाश्वत वातावरणासाठी योगदान देण्याची तर्कशक्ती निर्माण केली जाते. या सर्व उपक्रमात शाळाप्रमुख यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी शाळेला एका कार्यशील संस्थेत प्रवर्तित केले. ग्रामस्थांच्या सहकार्याने त्यांनी एक टीव्ही रूमही तयार करून घेतली



**शासकीय प्राथमिक शाळा, खार**

आहे. या खोलीचा उपयोग विशेषतः मल्टीमीडियाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी केला जातो ना, की परंपरागत पाठांतर पद्धतीच्या मार्गाने विद्यार्थी नैतिक कथा आणि कविता सादर करतात. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना दैनिक वर्तमानपत्र आणि त्यातील बातम्याविषयी जागरूक केले जाते. या खोलीत देखील संगणक आहे. यावर विद्यार्थी संगणकातील मूलभूत गोष्टी जाणून घेतात आणि संगणक हाताळण्याचा सराव करतात. पुस्तकांचे योगदान देणाऱ्या अन्य शिक्षक सहकाऱ्यांच्या मदतीने ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे. विद्यार्थी दुपारच्या जेवणानंतर अभ्यास करतात. शिकण्यात आनंद मिळावा म्हणून भिंतीवर चित्रे, सुविचार रंगविले आहेत. शाळेने विद्यार्थ्यांसाठी उन्हाळा व हिवाळा यासाठी स्वतंत्र, सुव्यवस्थित वॉशरूमची व्यवस्था केली आहे. जे विद्यार्थ्यांना कठोर हवामानातही त्यांचे अध्ययन करण्यासाठी सुकर करतात.



**कृती कक्ष**



**खेळाचे मैदान**



**स्वयंपाक घर**




अध्ययन अध्यापन साहित्य व कृतीखोली



वर्गखोली

शाळेचे एक खेळाचे मैदान देखील आहे. हे मैदान शाळाप्रमुखांच्या पुढाकाराने तयार करण्यात आले आहे. त्यांनी नजीकच्या काळात शाळेत ग्रीनहाऊस बनवण्याची योजना आखली असून त्यामुळे विद्यार्थ्यांना आरोग्यदायी आणि सकस आहार मिळू शकेल. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार देणारे एक कार्यक्षम आणि सुसज्ज स्वयंपाकघर आहे. एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, शाळा फक्त विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक स्तर फक्त उंचावण्याचा प्रयत्न करीत नाही, तर त्यांना सुयोग्य पौष्टिक आहार देखील पुरवते. अनेक अडचणींवर मात करत शाळा त्यांच्या विद्यार्थ्यांना जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश मिळवून देण्यात यशस्वी झाली आहे. छेवांग यांच्या मते, याचे कारण विद्यार्थी गणितात खूप चांगले आहेत. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

| S. No. | Year | Number of students qualified for Jawahar Navodaya Vidyalaya |
|---|---|---|
| 1. | 2009-2010 | 04 |
| 2. | 2010-2011 | 02 |
| 3. | 2011-2012 | 01 |
| 5. | 2013-2014 | 02 |
| 6. | 2014-2015 | 01 |
| 7. | 2015-2016 | 01 |
| 8. | 2016-2017 | 01 |
| 9. | 2017-2018 | 02 |

छेवांग यांच्यासारख्या शाळा प्रमुखांनी आपल्या निरंतर प्रयत्नांनी शाळा सुरू करून समाजासमोर एक चांगले उदाहरण प्रस्तुत केले आहे. आधुनिक शिक्षणाविषयीची त्यांची जागृती ही केवळ पाठांतर पद्धती आणि उताऱ्याच्या समजावर अवलंबून नव्हती, तर सभोवतालच्या वातावरणाला अनुसरून आणि विद्याशाखेचा विकास करण्याची जाणीव त्यात होती हे त्यांच्या शाळेच्या दृष्टी विधानावरून लक्षात येते. त्यांनी 22 ते 24 जानेवारी 2019 ला NCSL, NIEP- , Delhi आयोजित 'National conference on School Leadership Pathways for School Improvement' या परिषदेत सहभाग घेतला.



### शाळा प्रमुखाचे नाव : रागिणी रामचंद्र सुर्वे, जिल्हा परिषद आदर्श शाळा, निवळी चिपळूण, रत्नागिरी, महाराष्ट्र

जिल्हा परिषद आदर्श शाळा, निवळी चिपळूण ही महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यात आहे. ही भारतातील एक अनुकरणीय प्राथमिक शाळा आहे. मुख्याध्यापकांचा या शाळेवर विशेष प्रभाव दिसून येतो. परंपरागत पाठांतर पद्धतीचा वापर न करता रागिणी सुर्वे यांनी वर्गात नावीन्यपूर्ण वेगवेगळ्या अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचा अवलंब केला, परंतु हे त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठिंब्याशिवाय शक्य नव्हते. त्यांच्या सर्व शिक्षकांनी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील प्रगत कुमठे बीट मधील शाळांना भेटी दिल्या. या भेटीचा एक मनोरंजक परिणाम म्हणजे, तेथील शिक्षक सहकाऱ्यांकडून कृतीयुक्त अध्ययन–अध्यापन पद्धती संदर्भात झालेली ओळख. कृतीयुक्त अध्ययनाचे हे तंत्र शैक्षणिकदृष्ट्या चांगले निकाल देण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यास अत्यंत उपयोगी ठरले आणि त्यांच्या ज्ञान पातळीत सुधारणा झाली. हे तंत्र समजल्यानंतर मुख्याध्यापकांनी त्यांच्या सहकार्यांसोबत बैठक घेऊन या तंत्राची संकल्पना सर्वांना समजावून सांगितली. महत्वाचे म्हणजे सर्व शिक्षकांनी या कामात उत्साह दाखवला आणि शाळेत बदल घडवला आणि कृतियुक्त अध्यापन तंत्र स्वीकारले. त्यांनी रचनावादी वर्ग रचनेच्या अनुषंगाने फरशी, भिंती रंगवण्यात मदत केली.

शाळेत अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत खालील गोष्टींवर लक्ष केंद्रित करते.

- पटकथा आणि भूमिकाभिनयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवीन संकल्पना शिकवल्या जातात. विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमावर आधारित संकल्पनांवर रचना, अभिनय व नाटक करण्यास सांगितले जाते.
- विद्यार्थ्यांना तीन शब्द दिले जातात. त्यातून त्यांना एक नवीन कथा तयार करण्यास सांगतात. यामुळे विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार करण्याची आणि स्वतःची अभिव्यक्ती करण्यास ही कृती सक्षम बनविते आणि विद्यार्थ्यांचे चिकित्सक विचार कौशल्य विकसित करते.
- विद्यार्थ्यांचे त्यांच्या वयानुसार गट केले जातात आणि त्यांना साध्या शब्दात यमक जुळणाऱ्या कविता लिहिण्यास प्रोत्साहित केले जाते.



**जिल्हा परिषद आदर्श शाळा, निवाळी**

- विद्यार्थ्यांना एक शब्द दिला जातो आणि त्या शब्दांशी संबंधित शब्दांबद्दल विचार करायला सांगतात व लिहायला सांगतात, त्यामुळे त्यांच्या शब्दसंग्रहात वाढ होते.
- एका कृतीत विद्यार्थ्यांना मराठी अक्षर दिली जातात आणि त्या पासून नवीन शब्द तयार करण्याची प्रोत्साहित करणेदेखील समाविष्ट आहे. त्यांच्या शब्द संपत्तीत वाढ करण्याचा हा देखील एक प्रयोग आहे.
- गणिती तर्क करण्याची क्षमता वाढवणे–
  - विद्यार्थी दिलेल्या अंकांच्या आधारे संख्या तयार करतात.
  - संख्यांची चढत्या उतरत्या क्रमाने मांडणी करतात.
  - सम आणि विषम संख्या ओळखतात.
  - अंकाची स्थानिक किंमत सांगतात.

- संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार भागाकार करतात.
- डायस टाकून संख्या वाचायला सांगतात.

- विद्यार्थ्यांच्या इंग्रजीत सुधारणा करण्यासाठी त्यांना इंग्रजीत नाटक, कविता सादर करण्यास प्रोत्साहित केले जाते.
- विद्यार्थ्यांना त्यांची कलात्मक क्षमता सादर करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यांचे कलाकौशल्य दर्शवणारे प्रदर्शन आयोजित केले जाते.





मुलांना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत पालकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला. शाळेला जिल्हा परिषद शिक्षण समिती व शिक्षणाधिकारी यांनी या कार्याबद्दल गौरविले आहे. शाळेत मुख्याध्यापकांनी घडून आणलेल्या बदलाबद्दल डायटच्या अधिकाऱ्यांनी शाळेचे कौतुक केले. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील नवनवीन प्रयोग आणि उपक्रम हे केवळ ज्ञानात्मक वाढीसाठी विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षकांना देखील सक्षम बनवितात.



विद्यार्थ्यांना आता कठीण संकल्पना समजणे सोपे झाले आहे. उदाहरणार्थ समजा – क्रमांक 29 ला प्रत्येकी दहा सुट्या दांड्यांचे दोन गट आणि 9 सुटे अशाप्रकारे मांडणी करून 29 संख्या कशी तयार होते ते शिकवले जाते. विविध शैक्षणिक उपक्रमाद्वारे शिकण्याची प्रक्रिया सुलभ केली गेली आहे. यातच शाळा प्रमुख शाळेतील भौतिक सुविधा सोबतच शाळा व्यवस्थापन बळकट करण्याचे कार्य करीत आहेत.




शाळेतील अथक प्रयत्नांसाठी शाळेच्या मुख्याध्यापकांचा गौरव करण्यात आला. रागिणी आर.

सुर्वे यांनी 22 ते 24 जानेवारी 2019 ला NCSL, NIEP- , Delhi आयोजित 'National conference on School Leadership Pathways for School Improvement' या परिषदेत सहभाग घेतला.

**References0Audio-Visual Resources**

| Section | Name of the Video | Weblink |
|---|---|---|
| 4.1: Self and Motivation | Lead India Video | https://www.youtube.com/watch?v=JR8i9p3pcPg&feature=youtu.be |
| 4.2: Leaders in Action | Change Leadership and School Improvement: Role of School Head | https://www.youtube.com/ watch?v=hSfg6ON8iqQ&list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=4&t=0s |
| 4.3: Multiple Roles and Responsibilities | Developing School as a Learning Organization | https://www.youtube.com/watch?v=1NJEI6VXEQg &list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=11&t=0s |
| | Professional Development Plan | https://www.youtube.com/watch?v=QEhOFl6d_qU&list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=9&t=0s |
| | School and Purpose of Education | https://www.youtube.com/watch?v=Q9zbADOKd0E&list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=13&t=0s |
| | Knowing more about Innovations | https://www.youtube.com/watch?v=-VdNE3z13Ws&list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=8&t=0s |
| 5.1: Developing a Perspective on Active Learning Principles | Young Historians | https://youtu.be/p9VAM8yv2Ng |
| 5.2:Understanding of Pedagogical - Content Knowledge as a School Head | Pedagogical - Content Knowledge | https://www.youtube.com/watch?v=eE9U-WEhjMQ |
| 5.3:Academic Supervision in School | Observation, Feedback and Supervis | https://www.youtube.com/watch?v=GoC-5llGCTw&list=PLUgLcpnv1YidWTfKv5Z4E9zaskiV2ZCJf&index=10&t=0s |
| 6.1: Teachers as Reflective Practitioners | Teachers as Reflective Practitioners | https://www.youtube.com/watch?v=9fihPN41RaE |

*These videos can be accesed on "NCERT official" Youtube Channel*

## Publications :


- Awasthi, K. 2017. Academic Supervision and Feedback: Realizing The Potential of Field Level Leadership. http://csl.niepa.ac.in/
- ———.2017. Developing Professional Learning Communities: Leading Teachers' professional development in School Leadership development for System level Administrators. http://ncsl.niepa.ac.in/

- Diwan, Rashmi. 2013. Educational Leadership: A Conceptual Framework (NUEPA).
- Diwan, Rashmi and Pandada, B.K. 2013. Guiding through the preparation of School Development Plan: A handbook for school heads. (NUEPA).
- Mythili, N. 2017. Does School Leadership Matter for Student Learning in India? A Case Study of Sikkim. Indian Educational Review, December, 2017, Vol-56, No.2, pp. 34-63 ISSN 0019-561X. http://www.ncert.nic.in/publication/journals/pdf_files/IER_July_17.pdf.
- ———. 2019. Governance and Leadership for Achieving Higher Quality in School Education: A Study of Sikkim. Indian Journal of Public Administration, Vol. 65(2), April-June, 2019, ISSN no: 00195561 and eISSN no: 24570222.
- NUEPA. 2014. A Handbook on School Leadership Development (available in English, Hindi and all major regional languages). New Delhi.
- ———. 2015. National Programme Design and Curriculum framework on School leadership Development (available in English, Hindi and all major regional languages). Revised Edition. New Delhi
- Robinson, V., C. Lloyd and K.J. Rowe. 2008. The Impact of leadership on student outcomes: An analysis of the differential effects of leadership types. Educational Administration Quarterly. 44 (5), 635-674.
- Subitha, GV and Charu Smita Malik. (eds). 2016. Resource Book on One Month Certificate Course on School Leadership and Management, NUEPA, New Delhi.


## Web Resources :


- Learning outcomes. http://www.ncert.nic.in/pdf/Annual_report_17_18.pdf
- Maryellen Weimer. https://www.facultyfocus.com/articles/teaching-and-learning/five-key-principles-of-active-learning/ accessed on 20th May 2019
- National Curriculum Framework for Teacher Education Towards Preparing Professional and Humane Teacher. NCFTE. 2009.http://ncte-india.org/ncte_new/pdf/NCFTE_2010.pdf
- TESS-India. Transforming teaching-learning process: Leading teacher's professional development. https://www.open.edu/ openlearncreate/course/view.php?id=1911


## Websites :


- http://ncsl.niepa.ac.in/
- http://pslm.niepa.ac.in/
- https://itpd.ncert.gov.in/


❑❑❑